
MAHMARI 19358/13/1/2000 - TC

विद्या प्रसारक मंडळ
स्थापना • नौपाडा • ठाणे



# व्ही. पी. एम्. दिशा

वर्ष चौदावे / अंक ९ / सप्टेंबर २०१३

## संपादकीय

### विकृत उत्सवप्रियता आणि हतबल समाज

लोकांनी एकत्र यावे, विचारांची देवाणघेवाण व्हावी, इंग्रज करत असलेल्या अन्यायाविरुद्ध जनजागृती व्हावी आणि त्यातून काही सकारात्मक घडावे, देश लवकर स्वतंत्र व्हावा अशा उदात्त हेतूंनी लोकमान्य टिळकांनी गणेशोत्सव व शिवजयंती हे उत्सव सार्वजनिकरित्या साजरे करण्याची परंपरा सुरू केली. समाज प्रबोधन घडविण्याच्या दृष्टीने उत्सवांचे हे माध्यम काळाच्या ओघात काही वर्षे उपयुक्त ठरले, हे ऐतिहासिक सत्य मान्य करायलाच हवे. गणपती या देवतेचे पावित्र्य पूर्णपणे लक्षात घेऊन उत्सवांची आखणी केली जाई; दिशा ठरवली जाई. त्यावेळचे नेते नितीने वागणारे, देशावर प्रेम असणारे व जनतेचे नेतृत्व करण्याची क्षमता असणारे, देशाचे स्वातंत्र्य हे ध्येय डोळ्यांसमोर असणारे होते.

पुढे स्वातंत्र्य मिळाले व नेत्यांसह ज्या जनतेचे त्यांनी नेतृत्व करायचे त्या जनतेनेही स्वातंत्र्य म्हणजे स्वैराचार असे मानत या उत्सवांना संपूर्ण कलाटणी दिली. हे दोनच उत्सव नाहीत तर गोपाळकाला, नवरात्र, धुळवड आणि इतर लहान सहान सणांचे निमित्त करून उत्सवांचा अतिरेक व्हायला लागला. गर्दीचे मानसशास्त्र असते व त्याचे विशिष्ट पद्धतीने व्यवस्थापन करावे लागते, याचे कोणतेही भान न बाळगणारे गुंड प्रवृत्तीचे तथाकथित नेते 'मला पहा आणि फुले वहा' अशा थाटात या उत्सवामागील प्रेरणा ठरत गेले. भजन, कीर्तन किंवा कथाकथन, संस्कारक्षम नाटकांचे सादरीकरण करून समाजाला वैचारिक प्रेरणा देण्याची यांची इच्छा तर दूरच; पण स्वतःची छायाचित्रे पोलीस चौक्यांमध्ये 'पाहिजेत' (वाँटेड) अशा सूचना फलकावर झळकत असतानाही, आपले हजारो गुन्हे दडपून टाकण्याचे तंत्र अवगत करतात. शिवराम महादेव परांजपे यांच्या 'काळ' मधील एका निबंधात 'जसे लोक तसे त्यांचे देव' असा एक फार सुंदर निबंध आहे. India after Independance या ग्रंथातही People gets the Government they deserve हा विचार मांडण्यात आला आहे. जसे लोक, तसे त्यांचे राज्यकर्ते हे जर खरे असेल, तर हिंदू संस्कृतीचा वारसा सांगणाऱ्या भारतीय समाजाने कठोर आत्मपरीक्षण करावयास हवे.

पैसा आणि सर्व क्षेत्रांतील डोळे, दिपवणारा झगमगाट पहाणारी 'गरीब' जनता मग आंधळेपणाने चाचपडत रहाते. 'स्वातंत्र्य' याचा अर्थच न कळलेले, लोकशाही स्वीकारलेले सरकार मात्र हतबल ठरत रहाते. आमदार, खासदार यांचे

(पृष्ठ क्र २ वर)

(मुखपृष्ठावरून – **संपादकीय**)

स्थानिक कार्यकर्ते व त्यांना वापरणारे लहान स्तरांवरील तथाकथित नेते यांनी या देशात जी अनागोंदी माजवली आहे ती पाहता 'लोकशाही इतकी टिकलीच कशी' असे विचारणारे सुज्ञ व संवेदनशील पण मूठभर लोक प्रश्न विचारत आहेत, हे जाणवल्याशिवाय रहात नाही. आमदार, खासदार व इतर नेत्यांना मत देऊन निवडून देण्याचे अधिकार जसे जनतेला आहेत, तसेच अशा नेत्यांना माघारी बोलवण्याचेही अधिकार आहेत. हे अधिकार विसरून कंबरेचे डोक्याला गुंडाळून व्यासपीठावर नाचणारे, बडबडणारे, चिल्लर नेते, त्यांच्या पुढे पुढे करणाऱ्या लहान मोठ्या नट नट्या यांनी या सर्व उत्सवांचा मासळी बाजार करून टाकला आहे. न्यायालय काही उपयुक्त कायदे पारित करते. पण हे सगळे धाब्यावर बसवून संस्कृतीची विटंबना करणे चालूच आहे. 'मी' 'माझे कुटुंब' सर्व सुखसोयी असणारे माझे घर नावाचे खुराडे आणि अधिकाधिक पैसा कसा मिळेल, त्यासाठी कोणते व्यवहार व गैरव्यवहार करायचे या चिंतेत सामान्य माणसे कायम तणावाखाली असतात. अशा माणसांना चौकात एकत्र जमवून गोपाळकाल्यासारख्या उत्सवात ताटकळत उभे राहून 'थर' मोजण्यात 'थ्रिल' वाटते.

कुणाचा पायपोस कुणाच्या पायात नाही, कोणालाही देश, देशाची एकात्मता याबद्दल आस्था नाही. अशा लोकांचा कळप ठरावीक सीमारेषांमध्ये वर्षानुवर्षे जरी एकत्र राहिला, तरी त्याला 'देश म्हणता येईल का?' हा प्रश्नच आहे. कोणतेही सामाजिक भान नसणारी ही उत्सव मंडळे रक्तदान नेत्रदानाची मोहीम घेतल्याची भलावण करतात. भंपक देखावे करतात. सतत रहदारी असलेल्या रस्त्यांवर दिवे लावून आपल्या प्रतिमा झळाळणारे हे नेते पंधरा पंधरा दिवस-एकेक महिना मंडप घालून रस्ते अडवून बसतात. ज्यांच्या वापरासाठी रस्ता आहे त्या नागरिकांना वेठीस धरतात. रस्त्यात मंडपासाठी खड्डे पाडतात... हे कसले उत्सव? आधीच खड्डे इतके झाले आहेत की रस्ता शोधायला भिंगच लागेल; अशा वेळी दुतर्फा विविध जाहिराती टांगण्यासाठी बांबू रोवण्यास पाडलेले खड्डे हे नेते त्यांच्या खिशातून पैसे खर्च करून बुजवणार काय? रिकाम टेकडे कार्यकर्ते इतक्या मोठ्या प्रमाणात आहेत की त्यांची गर्दी अंगावर येते. त्यांच्या वडापावाची सोय झाली की अचकट विचकट हालचाली करत अशा उत्सवांमधून ते नाचत असतात. जनतेला, आजूबाजूच्या व्यवसायिकांना जमेल तेवढा व जमेल तसा त्रास देत असतात. कोणी विरोध केलाच, तर 'साहेबांचा' धाक दाखवतात.

गणपती हे बुद्धीचे तत्त्व आहे. आपल्या जीवनात कोणतेही लहान मोठे काम करताना त्याचे आधी स्मरण केले जाते, असे आपल्यावर संस्कार आहेत. गणेशाने या संस्कारहीन तथाकथित पदव्यांची भेंडोळी मिळवणाऱ्या नेत्यांना युवा नेत्यांना आणि त्यांच्या कार्यकर्त्यांना थोडी तरी बुद्धी द्यावी! नाही तर 'नवसाला पावणारा', 'दृष्टांत देणारा' अशा विशेषणांनी गणेशोत्सव मंडळांच्या जाहिराती चालूच असतात. हा बाजार वाढतच चालला आहे. मूर्तीची उंची तिचे दागदागिने दर्शनासाठी लागलेल्या रांगा अशा विषयांना माध्यमे नको तितकी प्रसिद्धी देत असतात. हे पाहिले की यातील अर्थशास्त्राची गुंतागुंत आंतरराष्ट्रीय अर्थतज्ज्ञांना तरी कळेल का? असा प्रश्न पडतो. गेली पंचवीस तीस वर्षे अशा उत्सवांवर केला जाणारा खर्च पाहिला तरी या देशात गरीबी आहे, असे सांगणारे लोक नाटकी वाटायला लागतात. केवळ मुंबई, ठाणे, पुणे, नाशिक या शहरांमधील अशा प्रकारच्या उत्सवाच्या नावाने खर्च केला जाणारा पैसा

(कव्हर ३ वर)

वर्ष चौदावे/अंक ९/सप्टेंबर २०१३

वर्ष चौदावे/अंक ९ /सप्टेंबर २०१३

**संपादक**
डॉ. विजय बेडेकर

**कार्यकारी संपादक**
श्री. मोहन पाठक

'दिशा' प्रारंभ जुलै १९९६
(वर्ष १८ वे/अंक ३ रा)

**कार्यालय**
विद्या प्रसारक मंडळ
डॉ. बेडेकर विद्या मंदिर
नौपाडा, ठाणे - ४०० ६०२
**दूरध्वनी : २५४२ ६२७०**
www.vpmthane.org

**मुद्रण स्थळ :**
परफेक्ट प्रिण्टस्,
नूरीबाबा दर्गा रोड, ठाणे.
**दूरध्वनी : २५३४ १२९१**
**२५४१ ३५४६**
Email : perfectprints@gmail.com

## अनुक्रमणिका


| | | | |
|---|---|---|---|
| १) | संपादकीय | श्री. मोहन पाठक | |
| २) | एका चित्राची कूळकथा | डॉ. विजय बेडेकर | ३ |
| ३) | हतबल केदारनाथ | डॉ. विजय बेडेकर | ८ |
| ४) | जीनान शहरातील बाडुदू झरा | डॉ. सुधाकर आगरकर | १० |
| ५) | श्रीमत् भगवद् गीता - अध्याय आठवा<br>विषय : अक्षर ब्रह्म योग | कै. शं. बा. मठ | १३ |
| ६) | सिद्धहस्त चतुरस्त्र गायक - जोडरागांचा<br>बादशहा संगीत भूषण पं. राम मराठे | श्री. सुनील परांजपे | १८ |
| ७) | समाजावर मनापासून प्रेम करणारे<br>कविवर्य पी. सावळाराम | श्री. मोहन पाठक | २२ |
| ८) | साहित्य-जगत | श्री. शरद जोशी | २४ |
| ९) | आठवणी जागतात-आठवणींचा मागोवा | श्री. मोहन पाठक | २६ |
| १०) | आयुर्वेद | सौ. स्वाती अजित राऊत | २७ |
| ११) | गुरुवर्य स. वि. कुळकर्णी यांस आदरांजली | श्री. ह. श्री. परांजपे | २९ |
| १२) | परिसर वार्ता | संकलित | ३२ |


या अंकात व्यक्त झालेली मते त्या लेखकांची वैयक्तिक मते असून त्या मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही.

# व्ही. पी. एम. दिशाच्या संदर्भात

- आपण दिशा नियमित वाचा. इतरांनाही वाचायला सांगा.
- हे व्यासपीठ अभ्यासपूर्ण लेखांसाठी आहे.
- शैक्षणिक संस्थेने असे मासिक चालवावे, याचे हे एकमेव उदाहरण आहे.
- आपण विचारप्रवृत्त लेख पाठवून दिशाला सहकार्य करू शकता.
- आपण स्वत: देणगी मूल्य द्या व इतरांना द्यायला सांगा.
- आपले देणगी मूल्ये द्यायचे राहिले नाही ना, कृपया पडताळून पाहा.
- दिशाच्या संदर्भात देणगी मूल्य, लेख पाठवावयाचे असतील तर कार्यवाह, विद्या प्रसारक मंडळ, डॉ. बेडेकर विद्या मंदिर नौपाडा, ठाणे ४००६०२ या पत्त्यावर पाठवा. ०२२-२५४२६२७० या क्रमांकावर संपर्क साधा.
- आपण सार्वजनिक ग्रंथालयाचे संचालक असाल वा असे एखादे ग्रंथालय चालवत असाल, तर आपण सभासद होणे अत्यंत गरजेचे आहे. महाविद्यालये, शाळा यांच्या प्रमुखांनीही आपल्या संस्थेची देणगी मूल्य पाठवावी.
- www.vpmthane.org या संकेत स्थळावर दिशाचे जुने अंक आपण पाहू शकता.
- वार्षिक देणगी मूल्याच रु. २५०/- चा धनादेश 'विद्या प्रसारक मंडळ A/C दिशा' या नावाने पाठवावा.

– संपादक

# एका चित्राची कूळकथा

*इतिहासातील घटनांवर प्रकाश टाकून अभ्यासाला दिशा देणाऱ्या स्त्रोतांपैकी तैलचित्रे हा एका महत्त्वाचा स्त्रोत आहे. अशाच एका चित्राचा हा अभ्यास. मा. डॉ. बेडेकर यांचे या विषयावर थोरले बाजीराव पेशवे सभागृहात व्याख्यान झाले होते. - का. संपादक*

इंग्रज आणि पेशवे यांच्या मधील टिपू (१७५०-१७९९) संबंधीचा तह हा पुण्याच्या शनिवारवाड्यातील गणेश महालात सन १७९० मध्ये झाला. हा क्षण टिपणारे हे तैलचित्र मात्र या घटनेनंतर १५ वर्षांनी श्री. थॉमस डॅनियल (१७४९-१८४०) या प्रसिद्ध इंग्रज चित्रकाराने काढले.

हे मूळ चित्र सर्वसामान्यांना बघण्याकरिता गेली २०० वर्षे उपलब्ध नव्हते. इंग्लंड मधील सोमार्सेत परगण्यातील शर्गोत या गावी श्री. चार्लेस मालेट (१७५२-१८१५) यांचा खापर पणतू श्री. एडवर्ड मालेट ह्यांच्याकडे हे चित्र होते. या बरोबर श्री. चार्लेस मालेट यांनी पुण्याहून नेलेल्या इतरही अनेक वस्तू त्यांच्याकडे होत्या. पुण्याचे इतिहास तज्ज्ञ डॉ. वा. द. दिवेकर यांनी प्रथमच ९x६ फूट आकाराचे हे तैलचित्र १९७४ साली त्यांच्या इंग्लंडच्या दौऱ्यात एडवर्ड मालेट यांचेकडे बघितले. त्यांच्या या भेटीवर आधारित एक लेख त्यांनी भारत इतिहास संशोधक मंडळाच्या त्रैमासिक खंड १८, ५५ वर्ष, १-४ या मध्ये ''सर चार्लेस मालेटच्या वंशजांकडील वस्तू''या शीर्षकाखाली लिहिला.

वरील महत्त्वाच्या चित्राबरोबर त्या वेळचा पुण्यातील एक मराठी चित्रकार गंगाराम चिंतामण नावागरे उर्फ तांबट यांनी तयार केलेली लाकडी चित्रे आणि कागदावर काढलेली अनेक जलरंगी चित्रेही श्री. दिवेकर यांनी श्री. एडवर्ड मालेट यांचेकडे बघितली. आज भारतातही श्री. नावागरे यांची चित्रे उपलब्ध नाहीत. मालेट यांच्या सांगण्यावरून गंगाराम यांनी वेरुळच्या लेण्यांचीही चित्रे काढली होती. जेम्स वेल्स (१७४७-१७९५) यांनी काढलेले घोड्यावरचे सवाई माधवराव पेशवे यांचे सुंदर चित्रही या संग्रहात आहे.

जानेवारी १७८५ मध्ये मालेट यांची इंग्रजांचे वकील म्हणून पेशव्यांच्या दरबारी नेमणूक झाली आणि ३ मार्च १७८६ रोजी त्यांनी पुण्यात पदार्पण केले. मालेट ११ वर्ष पुण्यात राहिले आणि पुण्यातील अनेक लहानथोर व्यक्तींशी त्यांचा संबंध आला. मालेट यांचा पुण्यातील काळ म्हणजे सवाई माधवराव पेशवे (१७७४-१७९५)आणि नाना फडणवीसांचा (१७४२-१८००) काळ होता. मालेट यांच्या कारकिर्दीत घडलेल्या महत्त्वाच्या घटना म्हणजे १) पेशवे-निजाम-इंग्रज यांनी टिपू विरुद्ध केलेला मैत्रीचा तह. त्यांच्या या कामगिरीकरता १७९१ साली त्यांना 'नाईटहुड' आणि 'सर' हा मानाचा किताब बहाल करण्यात आला होता. २) खर्डे येथील लढाईत निजाम विरुद्ध पेशव्यांचा विजय आणि मालेट यांनी या लढाई वर लिहिलेला लेख. ३) सवाई माधवरावांचा ऑक्टोबर १७९५ मध्ये झालेला अपघाती मृत्यू.

मार्च १७९७ मध्ये मालेट यांनी पुण्याचा आणि भारताचा कायमचा निरोप घेतला.

मालेट यांच्या बरोबर ५ ते ६ इतर इंग्रज मुत्सद्धीही पुण्यात त्यांच्या बरोबर रहात होते. त्यांनी अनेक पाश्चात्त्य वस्तू, वैद्यक, चित्रकला इत्यादींचा पुण्यात प्रसार केला.

'सवाई माधवराव पेशवे यांचे दरबार चित्र' म्हणून हे चित्र आज २०० वर्षांहून अधिक काळ प्रसिद्ध आहे. पण हे चित्र केव्हा, कोठे आणि कोणी काढले, याबद्दल मात्र

ठोस माहिती आणि पुरावे उपलब्ध होत नव्हते. श्री. दिवेकर आणि श्री. गोडसे यांनी सुमारे ३५ वर्षांपूर्वी लेख लिहून या चित्रासंबंधीची संदिग्धता दूर केली. आधीच सांगितल्या प्रमाणे सुमारे ६ वर्षापूर्वी म्हणजे २००७ साली प्रथमच हे मूळ चित्र इंग्लंड मधल्या 'टेट' या आधुनिक चित्र संग्रहालयात प्रदर्शित करण्यात आले.

या चित्रासंबंधीचा पहिला उल्लेख एडवर्ड मूर (१७७१-१८४८) यांच्या हिंदू पन्थिओअन या १८१० साली लंडनहून प्रसिद्ध झालेल्या ग्रंथात सापडतो. या चित्रामधील लहानसहान बारकावे आणि सवाई माधवराव पेशव्यांच्या दरबाराची माहिती खालील संशोधन साहित्यातून मिळते.

१) 'सर चार्लस मालेटच्या वंशजाकडील वस्तू'- डॉ. वा. द. दिवेकर, भारत इतिहास संशोधक मंडळ त्रैमासिक, खंड १८, वर्ष ५५, अंक १-४

२) 'एक दरबार चित्र आणि चरित्र'- श्री द. ग. गोडसे, महाराष्ट्र टाईम्स वार्षिक : १९७७

३) सवाई माधवराव पेशव्यांचा दरबार ले. द. ब. पारसनीस

चार्लेस मालेट हा पेशवे दरबारात आणि पुण्यात खूपच प्रसिद्ध झाला होता. प्रामाणिकपणा, सचोटी बरोबरच तो चांगला मुत्सद्धीही होता. पेशव्यांप्रमाणे दरबारातील इतर मुत्सद्यांच्या घरातील लग्न, मुंज, गणेशोत्सव ई. कार्यक्रमांनाही तो जातीने हजर राही. मुत्सद्याला लागणारी लोकसंग्रहाची कला त्याला चांगलीच अवगत होती. कंपनी सरकारशी तो एवढा प्रामाणिक होता, की पुण्याच्या त्याच्या वास्तव्यात त्याला भेट म्हणून मिळालेल्या सर्व वस्तू त्याने कंपनीकडे जमा केल्या होत्या. एवढेच नाही, तर पुणे सोडताना दुसऱ्या बाजीरावाने प्रवास खर्चाकरिता त्याला दिलेले रुपये १५००० ही त्याने कंपनी सरकारकडे जमा केले. आजच्या भ्रष्टाचारी पार्श्वभूमीवर इंग्रज अधिकाऱ्यांचा हा प्रामाणिकपणा लक्षात ठेवण्याजोगा आहे. कुठल्याही सरकार किंवा संस्थेकडे असे प्रामाणिक सेवक असतील तर त्यांचा उत्कर्ष कोणीही थांबवू शकत नाही.

सर्व पुणे जरी मालेटच्या प्रेमात पडले होते तरी पेशवे दरबारातील दोन मुत्सद्धी, नाना फडणवीस आणि हरिपंत फडके मात्र मालेटच्या या पुणे प्रेमाबद्दल साशंक होते. दोघांचीही मालेटबद्दलची ही मते योग्य असल्याचेच आता निदर्शनास आले आहे. मालेटचे हे पुणे प्रेम हे मतलबी आणि मुत्सद्दीपणाचाच एक भाग असल्याचे आता सिद्ध झाले आहे. मालेटने कंपनी सरकारशी केलेला गुप्त पत्रव्यवहार १९३६ साली तीन खंडांत प्रसिद्ध झाला. पहिल्या दोन खंडांचे संपादन श्री.जदुनाथ सरकार (१८७०-१९५८) आणि रियासतकार श्री.(गोविंद सखाराम) सरदेसाई (१८६५-१९५९) यांनी अनुक्रमे केले आहे. दुसऱ्या खंडात मालेट यांचा हा पत्रव्यवहार समाविष्ट आहे. त्यांची पेशवे दरबार आणि त्यातील मुत्सद्धी यांच्याबद्दलची परखड मते ही त्यांच्या 'पुणे प्रेमा' वर प्रकाश टाकणारी आहेत. श्री. गोडसे यांच्या शब्दात सांगायचे तर ''वरकरणी गोड बोलणारा मालेट अंतर्यामी नुसता मतलबीच नव्हे तर मराठ्यांबद्दल किती द्वेषग्रस्त होता याचे स्पष्ट प्रत्यंतर या इंग्रजी पत्रव्यवहारातून अनेक वेळा येते.''

मालेट हा खूप महत्त्वाकांक्षीही होता. गव्हर्नर जनरल किंवा कमीत कमी मुंबईचा गव्हर्नर होण्याची तरी त्याची तीव्र इच्छा होती. तसे होण्याची सुतराम शक्यता नसल्याचे जेव्हा त्याच्या लक्षात आले, तेव्हा तो नाराज झाला आणि पुण्याबरोबरच भारतही सोडण्याचा त्याने निर्णय घेतला आणि सन १७९७ साली तो इंग्लंडला कायमचा परतला.

इंग्रज आणि पेशवे यांच्या मधील टिपू (१७५०-१७९९) संबंधीचा तह हा पुण्याच्या शनिवारवाड्यातील गणेश महालात सन १७९० मध्ये झाला. हा क्षण टिपणारे



हे तैलचित्र मात्र या घटने नंतर १५ वर्षांनी श्री. थॉमस डॅनियल (१७४९-१८४०) या प्रसिद्ध इंग्रज चित्रकाराने काढले, हे आता मान्य झाले आहे. १८०५ साली रॉयल अकॅडेमीच्या वार्षिक प्रदर्शनात हे चित्र बघितल्याची काहींची नोंद मिळत असली, तरी या प्रदर्शनाच्या निमित्ताने प्रकाशित केलेल्या सूचीत मात्र या चित्राची नोंद नाही. पुण्यात बरेच काळ राहिलेल्या कॅप्टन मूरने ते चित्रप्रदर्शनात पाहून त्याची तारीफ केल्याची नोंद श्री. गोडसे आपल्या लेखात करतात. १८०७ साली चार्ल्स टेर्नेर (१७७४-१८५७) यांनी या चित्राची लहान मेझोप्रिंट प्रकाशित केली आणि त्याची एक प्रत श्री. क्रिब यांनी श्री. मालेट यांना भेट दिली. या नंतर या चित्राच्या अनेक प्रती युरोप आणि भारतात निघाल्या. या चित्र निर्मितीचा काळ, कर्ता आणि ठिकाण आता आपल्याला नक्की माहीत आहे.

हे चित्र पुण्याला प्रत्यक्ष तहाच्या वेळी काढले गेले नव्हते, हे ही आता निर्विवाद सिद्ध झाले आहे. यामुळेच हे चित्र जेम्स वेल्स किंवा थॉमस डॅनियल यांनी प्रत्यक्ष शनिवारवाड्यात हजर राहून काढले, ही विधाने साधार नाहीत. एक तर जेम्स वेल्स (१७४७-१७९५) हा भारतातच १७९१ मध्ये आला. त्यामुळे या प्रसंगी तो हजर असण्याची शक्यताच नाही. श्री. थॉमस डॅनियल हा या वेळी भारतात असला तरी तो त्यावेळी हैद्राबाद येथे असल्याची नोंद आहे. नंतरही तो कधी पुण्याला आल्याची नोंद नाही. तेव्हा, हे चित्र श्री. थॉमस डॅनियल ने काढले असले, तरी ते पुण्याऐवजी इंग्लंडला काढले. शिवाय या तहाकरता जो मुहूर्त काढण्यात आला होता तो सकाळी ६ या आडवेळी काढला होता, श्री. मालेट यांनी स्वतः गव्हर्नर जनरलला लिहिलेल्या पत्रात याचा उल्लेख केला आहे. यामुळेच कला इतिहासकारांना या चित्राचा अभ्यास हे एक आव्हानच आहे. हे चित्र तैलचित्राचा एक उत्कृष्ट नमुना असला तरी मुळातच ते ऐकीव माहितीवर आधारित असल्यामुळे त्यामध्ये तपशिलाच्या अनेक चुका राहिल्या आहेत. पेशवेकालीन दरबाराच्या चालीरीती, सामाजिक आणि सांस्कृतिक जडण घडण, प्रत्यक्ष गणेश महालाचे वर्णन इ. गोष्टींची माहिती त्या काळात पुण्याला राहणाऱ्या किंवा प्रवासात असलेल्या गोऱ्या अधिकाऱ्यांनी नोंद करुन ठेवल्या आहेत. श्री. गोडसे यांनी या सर्व तपशिलाचा अभ्यास करून एरवी सुंदर असण्याऱ्या या चित्रातील विसंगती दाखवून दिल्या आहेत.

१) शनिवार वाड्यातील गणेश महाल प्रत्यक्ष पाहिलेल्या इंग्रज अधिकाऱ्यांनी या महालाच्या नक्षीकाम आणि सुरुच्या खांबांचे विशेष वर्णन केले आहे. प्रत्यक्ष चित्रातील खांब ग्रीक किवा रोमन शैलीचे दिसतात. एडवर्ड मूर यांनी हे चित्र बघितल्यावर प्रत्यक्ष गणेश महाल आणि त्याचे हे चित्र यांतील तफावत नोंद करून ठेवली आहे.

२) मूळ गणेश महालात छताला टेकलेल्या भिंतींवर अनेक अवतार चित्रे आणि समुद्र मंथनाची चित्रे तत्कालीन मराठी चित्रकारांनी काढलेली असणार.श्री. थॉमस डॅनियलने ही चित्रे दाखवण्याचा प्रयत्न केलेला दिसतो. अवतार आणि देवदेवतांच्या चित्रांकरिता डॅनियल यांनी त्यावेळी श्री. मूर यांनी काढलेल्या आणि जमवलेल्या अशा प्रकारच्या चित्रांचा वापर केलेला दिसतो. मूर यांचा हा संग्रह ब्रिटिश संग्रहालयात जमा आहे. तरीही डॅनियल यांनी तपशिलात बराच गोंधळ घातलेला दिसतो. कृष्ण आणि गोपींच्या चित्रातील गायींची ठेवण ही युरोपियन गायींसारखी दिसते.

अपमानाच्या व औषधाच्या गोळ्या चघळायच्या नसतात. त्या गिळायच्या असतात.

समुद्रमंथनातील असुरांची चेहेरेपट्टी ही ख्रिस्ती कथांमध्ये दाखवलेल्या डेव्हिल्स किवा साटनसारखी आहे. चित्रामधील देवांचे मुकुट हे साक्सन राजांच्या मुकुटासारखे आहेत.

३) हे चित्र प्रत्यक्ष घटने नंतर १५ वर्षांनी काढले गेल्यामुळे अनेक दरबारी संकेतांचा त्या चित्रात अभाव आहे. प्रत्यक्ष दरबारात नाना फडणवीस सवाई माधवरावांच्या उजव्या बाजूस बसण्याचा संकेत किंवा प्रघात होता. हा दरबार प्रथेचा बारकावा माहीत नसल्याने, चित्रामध्ये नाना फडणवीस सवाई माधवरावांच्या डाव्या बाजूला बसलेले दाखवले गेले आहेत. पेशवे दरबारचा दुसरा महत्त्वाचा संकेत म्हणजे भेटीकरता आलेल्या गोऱ्या अधिकाऱ्यांना पायातील जोडे बाहेर काढून आत यावे लागे. पेशव्यांना पायाचे तळवे दिसणार नाहीत अशा प्रकारे मांडी घालून बसावे लागे. या चित्रात मात्र मालेट आणि त्याचे सहकारी बूट घालून बसलेले दाखवले आहेत.

४) दरबारातील गर्दीमध्येही अमराठी लोक जास्त दिसतात. त्यांच्या पगड्या, अंगावरील आभूषणे आणि कपड्यांची ठेवण सर्वच उत्तर भारतातील सरदारांसारखी दिसते. डॅनियलने आग्रा येथील महादजी शिंद्यांच्या दरबाराचे चित्र काढले होते. त्याचाच प्रभाव या चित्रातील गर्दीच्या चित्रीकरणात झाला असण्याची शक्यता आहे. पुणेरी पगड्या अभावानेच दिसतात.

१९ व्या शतकाच्या पूर्वार्धात भारत आणि भारतीय संस्कृतीबद्दल प्रचंड उत्सुकता निर्माण झाली होती. याची खरी सुरुवात १८ व्या शतकाच्या उत्तरार्धात सर विल्यम जोन्स (१७४६-१७९४) यांच्या संस्कृतच्या अभ्यासाने झाली. परंतु त्याच काळात युरोप आणि विशेषतः इंग्लंडहून अनेक चित्रकार भारतात आले आणि त्यांनी उत्तरेपासून दक्षिणेपर्यंत प्रवास करून भारतातील मंदिरे, घाट, दरबार, बाजार आणि त्या बरोबरच मोठ्या प्रमाणावर निसर्ग आणि राजे राजवाड्यांपासून सामान्य माणसांची व्यक्तिचित्रेही काढली. एवढेच नाही, तर इंग्लंडला परत गेल्यावर तेथील कला दालनातून त्यांच्या चित्रांची प्रदर्शने लावली. छपाई तंत्रज्ञानामध्ये होणाऱ्या प्रगतीचा फायदा घेऊन चित्रांचे संच प्रकाशित केले. प्रबोधनयुग (renaissance) आणि औद्योगिक क्रांतीमुळे नवीन प्रगल्भ आणि सधन वर्ग युरोपमध्ये निर्माण होत होता. जेम्स वेल्स, थॉमस दानिअल आणि त्याचा पुतण्या विल्यम (१७६९-१८३७) हे या भारताबद्दलच्या चित्राद्वारे माहिती देण्याच्या प्रसारात सर्वांत पुढे होते. त्यांची पुस्तके आणि प्रदर्शनांनी भारताबद्दल प्रचंड कुतूहल आणि सहानभुती निर्माण केली. विल्यम हॉग (१७४४-१७९८), जेशुआ रेयनोल्ड्स (१७२३-१७९२), तिली केटल (१७३५-१७८६), जॉन झोफनि (१७३३-१८१०) आणि बलथाझार सोल्व्यन्स (१७६०-१८२४) या युरोपियन चित्रकारांनीही याच काळात भारतावरील चित्रे आणि पुस्तकांच्या माध्यमातून या कुतूहलामध्ये भर टाकली. १७६० ते १८२० या काळात सुमारे ६० युरोपियन चित्रकारांनी भारताला भेट देऊन शेकड्यांनी चित्रे काढली. अमेरिका आणि युरोपमधल्या कलादालन आणि संग्रहालयांतून आजही हि चित्रेआपल्याला बघायला मिळतात. मिल्ड्रेड आर्चर (१९११-२००५) या विदुषीनी सुमारे अर्धा डझन पुस्तके या विषयावर प्रकाशित केली आहेत.

आपल्याकडे चित्र किंवा शिल्पाचा अभ्यास फारच कमी होतो. अमेरिका किंवा युरोपमधील विद्यापीठांतून या साधनांचा वापर इतिहास संशोधनामध्ये मोठ्या प्रमाणात केला जातो. विशेषतः सामाजिक आणि सांस्कृतिक संशोधनात लिखित साधनांबरोबरच चित्रे आणि शिल्पांमध्ये दाखवलेल्या तपशिलाचाही उपयोग केला जातो.

मला खात्री आहे की आज माझ्या समोर बसलेले विज्ञान, समाजशास्त्र आणि इतिहासाचे विद्यार्थी आणि

---

कोणी पुसणार असेल तर डोळे भरून यायला अर्थ असतो. परंतु कोणाचेही डोळे ओले होणार नसतील तर मरणसुद्धा व्यर्थ असते.

त्यांचे शिक्षक यापुढे चित्र आणि शिल्पांचा वापर आपल्या संशोधनात आग्रहाने करतील. मी स्वतः भारतातील एक ताडी तराजू (steelyard) आणि युरोपिअन चित्रांमधील भारतीय नोकरांचे चित्रण यांच्या अभ्यासाकरिता अशा चित्रांच्या शोधात आहे. धन्यवाद.

(डॉ. विजय बेडेकर यांनी शनिवार, २० जुलै २०१३ रोजी दिशा व्यासपीठातर्फे ठाणे महाविद्यालय परिसरातील थोरले बाजीराव पेशवे सभागृहात दुपारी २ वाजता 'एका चित्राची कूळकथा' या विषयावर दिलेले भाषण )

●●●

## ग्लोबल ग्रीन किडस्

अनेक देशांचे पर्यावरणासाठीचे जे युद्ध चालू आहे, त्या पार्श्वभूमीवर त्या विरोधात कोपेनहेगेन येथे जी आंतरराष्ट्रीय परिषद दोन अडीच वर्षांपूर्वी झाली, त्या परिषदेची नोंद बंगलुरु मधील विद्यार्थ्यांनी पदयात्रा काढून घेतली. परिसरातील शाळेत जाणाऱ्या अनेक विद्यार्थ्यांनी ग्लोबल ग्रीन किडस या नावाने हवामानातील बदलांच्या व कचऱ्याच्या प्रश्नासंबंधी जनजागृती करण्यासाठी पदयात्रा व काही उपक्रम हाती घेतले. २००२ मध्ये सातवी व आठवीच्या मुलांनी या गटाची बांधणी केली. करन अरोरा या एका सभासदाने सांगितले, की सर्वांत घातक खलनायक जर कोणता असेल तर शहरी व ग्रामीण भागांत वाढलेले प्लॅस्टिकचे प्रमाण. या प्लॅस्टिकचा वापर नीट न झाल्यास पर्यावरणास ते विषारी आहे. माती व पाण्यात निर्माण होणारी ही विषे मिसळतात आणि जनावरांच्या मृत्यूला कारणीभूत ठरतात. ही विषेच खाद्य अन्न साखळीत व्यत्यय आणतात.

संदर्भ : ग्लोबल ग्रीन किडस
एप्रिल पॉझिटिव्ह, एप्रिल १० पृ. ८ व ९

## समाधान

या तणावग्रस्त जगात सुखी, समाधानी माणूस मिळणं दुरापास्त झालं आहे. जर माणूस समाधानी झाला, तर त्याला निश्चितच मन:शांती मिळणार आहे. त्याचं मन प्रसन्न होऊन तो आनंदी जीवन अनुभवणार आहे. याचाच अर्थ, या ठिकाणी आपल्याला 'समाधान' आणि 'समाधानी अवस्था' यांतील फरक पाहावा लागेल. समाधान हे क्षणिक असून ते कशाशी न कशाशी तरी निगडित असतं. तर समाधानी अवस्था ही कायमस्वरूपी मानसिक अवस्था आहे.समाधान केव्हा होतं? माणसाच्या मनासारखं झालं की म्हणजेच अपेक्षापूर्ती झाली, की समाधान होतं. हवीहवीशी वाटणारी वस्तू मिळाली, आपल्या मनाप्रमाणे एखादी घटना घडली किंवा प्रिय असलेली व्यक्ती भेटली, की समाधान होतं. पण हे समाधान क्षणिकच ठरतं. माणूस असंख्य अपेक्षांवर जगत असतो. क्वचित अपेक्षापूर्तीचं समाधान मिळतंही. पण वाट्याला बहुतांशी येतात ते अपेक्षाभंगच ! क्षणिक समाधान आणि समाधानी अवस्था यांतला फरक पाहायचा असेल, तर आपल्याला मनाचा विचार करावा लागेल. कारण दोन्ही जाणिवा मनालाच असतात. त्यासाठी आपण मनाच्या दोन भिन्न स्तरांचा विचार करू. 'अध्यात्म विज्ञाना'च्या मनावरील संशोधनाप्रमाणे बहिर्मन हे संपूर्ण शरीर व्यापून असतं. त्याचा मेंदूशी संपर्क असतो. ते भावनाप्रधान असून अतिशय चंचल असतं. बाह्य गोष्टीचं ज्ञान मिळवणं, त्याची मेंदूत नोंद करणं आणि त्याआधारे विचार किंवा कल्पना करणं हे त्याचं काम असतं. आलेल्या अनुभवांवरून जीवनाकडे बघण्याची त्याची नजर तयार होते. अंतर्मनाची जागा छातीच्या भागात असते. याला स्थिर भाव असतो. भाव व्यक्त होण्यापुरताच त्याचा मेंदूशी संपर्क येतो. मात्र बहिर्मनाच्या सतत चालणाऱ्या एकाच प्रकारच्या विचारांचे किंवा एकाच प्रकारच्या सतत उत्पन्न होणाऱ्या भावनांचे संस्कार अंतर्मनावर होतात. हेच संस्कार अंतर्मनात भाव बनून स्थिरावतात. पुढे स्थिरावलेला तीव्र भाव हा त्या व्यक्तीचा स्वभाव बनतो. एखादी व्यक्ती समाधानी आहे असं आपण म्हणतो, तेव्हा समाधान हा त्या व्यक्तीचा स्थायी भाव असतो. समाधानी होण्यासाठी बहिर्मनाची नजर बदलून आपला स्वभाव आपल्याला बदलता येतो.

**– संग्रहातून**

# हतबल केदारनाथ

*वि. प्र. मं. दिशाचे, सन्माननीय संपादक व विद्याप्रसारक मंडळाचे कार्याध्यक्ष डॉ. विजय बेडेकर सद्‌धर्म या त्रैमासिकाचेही संपादक आहेत. त्यांच्या जुलै १३ च्या सद्‌धर्म अंकाचे संपादकीय दिशाच्या वाचकांसाठी येथे पुर्नमुद्रित करत आहोत - कार्यकारी संपादक*

उत्तराखंडात नैसर्गिक आपत्तीमुळे झालेला हाहाःकार हा सध्या चर्चेचा विषय आहे. नैसर्गिक आपत्ती या कधीच सांगून येत नसतात आणि इतिहासात अशा शेकडो आपत्तींची नोंद आहे. उत्तराखंडामधील या भीषण आपत्तीची तीव्रता ही मानवाने अनेक नैसर्गिक स्रोतांमध्ये केलेल्या हस्तक्षेपामुळे वाढली, असे अभ्यासकांचे म्हणणे आहे. जागतिक स्तरावर तापमानामधील बदल हा गेल्या अनेक शतकांमधील मानवी हस्तक्षेपामुळे आहे, हे आता विज्ञानाने मान्य केले आहे. हा मानवी हस्तक्षेप म्हणजे नैसर्गिक साधनसंपत्तीचा बेसुमार, असंतुलित वापर. समाजाला या संबंधात माहिती व्हावी म्हणून शालेय आणि महाविद्यालयीन अभ्यासक्रमांमध्ये पर्यावरण शास्त्राचा अंतर्भाव केला आहे. पण पुराणातील ही वांगी पुराणातच राहिली. आपल्या चंगळवादी जीवनशैलीत बदल होत असेल तर जीवनशैली अधिकच चंगळवादी होण्याकडे होत आहे. कोणा विचारवंताने म्हटल्याप्रमाणे माणसाच्या गरजे करता निसर्गात भरपूर आहे, पण हव्यासामुळे फक्त विनाशच आहे. आजकाल होणाऱ्या नैसर्गिक आपत्तींची वाढणारी तीव्रता हे याचे उदाहरण आहे.




उत्तरेकडील केदारनाथ, बद्रिनाथ इत्यादी तीर्थस्थाने ही हिंदूंची मोठी श्रद्धास्थाने आहेत. वास्तविक भारताच्या पूर्व, पश्चिम, उत्तर, दक्षिण या सर्व ठिकाणी असे धाम आहेत. गृहस्थाश्रम संपल्यावर सर्वसाधारणपणे अशा धामांची यात्रा हे गेली काही शतकेच नाही तर सहस्त्र वर्षे हिंदू श्रद्धने करत आले आहेत. आपल्या देशभ्रमणाबरोबरच इतर भौगोलिक क्षेत्रांमधील सामाजिक, सांस्कृतिक जडणघडणीचीही यामुळे ओळख पटत होती. उत्तर आयुष्यामध्ये अधिक अंतर्मुख होण्याकरता लागणारा निवांतपणा आणि संधीही यामुळे प्राप्त होत असे. आजच्या 'सहल' या संकल्पनेचा त्यामध्ये लवलेशही नव्हता. केदारनाथ, बद्रिनाथ या डोंगराळ भागांत धामे असणाऱ्या या गावांची नवीन नागरिकांना सामावून घेण्याची क्षमता सिमितच होती. पण या धामांना जेव्हा पर्यटन स्थळांचे स्वरूप मिळाले, तेव्हा तेथील मानवी गरजांच्या क्षमतांची वाढ होऊ लागली. रस्त्यांपासून निवासांपर्यंत ही वाढ होत असताना ती पेलण्याच्या क्षमतेचा कधीच विचार केला गेला नाही. उलट दिसेल त्या जागेवर, अगदी नदीच्या पात्रातही, शहरनियोजनाचे सर्व नियम धाब्यावर बसवून बांधकामे करण्यात आली. याकरता लागणाऱ्या साधनांकरता जंगलतोड करण्यात आली. नदीच्या प्रवाहांवर बंधारे बांधण्यात आले. या सर्वांना ''अर्थ'' हेच कारण होते. सहल कंपन्यांनी आपली दुकाने थाटली.

श्रद्धेचा बाजार मांडून जास्तीत जास्त लोकांना अशा स्थळांकडे आकर्षित केले जाऊ लागले. स्थानिक जनतेनेही या सगळ्या व्यवहारांकडे आर्थिक लाभाच्या दृष्टीनेच पाहिले. यामध्ये 'धर्म' किंवा 'श्रद्धा' याला व्यापारापलिकडे काहीही अर्थ नव्हता. तेथे राहणारे आणि नवीन येणारे सर्व बहुतांशी हिंदूच आहेत. फलाविना कर्म, निरपेक्ष दान, आणि साधे राहणीमान ही हिंदू धर्माची वैशिष्ट्ये आहेत. निसर्गाच्या सर्वच व्यक्त आणि अव्यक्त शक्तींची हिंदू पूजा करतो. वास्तविक ही पूजा म्हणजे या शक्तींचा आदर करणे हे असताना त्याची जागा आता बाह्य निरुपयोगी कर्मकांडांनी घेतली. ही कर्मकांडेही हा आदर व्यक्त करणारी साधने होती; व्यापाराची संधी नव्हती. माणसाला अंतर्मुख बनवणारी, त्यांच्यातील विवेक जागृत करणारी, घेण्यापेक्षा देण्यावर भर देणारी मानसिकता निर्माण करणे, हे हिंदू धर्माचे अंतिम उद्दिष्ट आहे. निर्वाण, मुक्ती, समाधी यांच्याकडे जाण्याकरता कराव्या लागणाऱ्या तयारीचा तो भाग आहे. तो व्यापार नसल्याने श्रद्धेला तेथे स्थान आहे. ही श्रद्धा माणसाला अंतर्मुख करते, समर्पणाला तयार करते. दुर्दैवाने श्रद्धेच्या या ''अर्था'' ला आज त्यामध्ये अपेक्षित असलेल्या विचारांच्या विरुद्ध 'परिमाणे' प्राप्त झाली आणि हीच खरी शोकान्तिका आहे.

दूरदर्शनावरील एका वाहिनीने केदारनाथ येथील शंकराचार्यांची मुलाखत घेतली. हे मंदिर चहूबाजूंनी भाविकांच्या शवांनी वेढले गेले होते. यामुळेच शंकराचार्य सांगत होते की, या देवळाची शुद्धी करून घेण्यात येईल. वास्तविक कोणतेही हिंदू देऊळ हे अस्वच्छ होऊ शकते, पण अशुद्ध होऊ शकत नाही. वास्तविक निश्चल प्रेतांपेक्षा, भ्रष्टाचार, व्यभिचार व स्वार्थाने बरबटलेला जिवंत माणसांच्या वावरामुळेच ही मंदिरे अधिक अशुद्ध होत असतात. श्रद्धेचा व्यापार करणारे तेथील बडवे क्षणाक्षणाला तेथील मंदिर अपवित्र करीत असतात. शंकराचार्य किंवा धर्म मार्तंडाचे काम, निदान हिंदू धर्मात तरी, मानवाला या स्खलनापासून वाचवण्याचे असते. संवेदनाशून्य, बधिर जिवंत माणसांपेक्षा प्रेते कमी धोकदायक असतात. सरकार हे लोकांचे प्रतिनिधित्व करते. भ्रष्ट समाजाचे नेते स्वच्छ असूच शकत नाहीत. खरी आपत्ती आहे ती हिंदूच्या आजच्या मानसिकतेची, हे ज्या दिवशी आपण ओळखू त्यावेळी नैसर्गिक आपत्ती जरी थांबवू शकलो नाही, तरी तिच्या विध्वंसाची तीव्रता तरी नक्कीच कमी करू शकू! ही आपत्ती आणि विध्वंस ही या केदारनाथाने श्रद्धेचा व्यापार करणाऱ्या, संवेदना शून्य आणि बधिर समाजाला दिलेली शिक्षा आहे, एवढाच 'अर्थ' यातून निघू शकतो.

**– डॉ. विजय बेडेकर**
संपादक दिशा

●●●



**गणपतीला पाहताना आपल्याला जाणवेल**

**मोठे डोके** : मोठे विचार करण्यासाठी

**छोटे डोळे** : एकाग्रतेसाठी

**मोठे कान** : जास्त ऐकण्यासाठी

**लहान तोंड** : कमी बोलण्यासाठी

**मोठे पोट** : सुख आणि दुःख पचविण्यासाठी

**आशीर्वाद** : यशस्वी होऊन अध्यात्मिक प्रगतीसाठी

**शस्त्र** : दुष्ट शक्तींच्या विनाशासाठी

**मोदक** : साधनेचे फलित

**उंदीर** : मोहाचं प्रतीक, मोहावर आरूढ होऊन विजय मिळविण्यासाठी.

**– संग्रहातून**

# जीनान शहरातील बाडुटू झरा

*जीनान शहरातील बाडुटू या झऱ्याला दिलेल्या भेटीचे वर्णन करणारा हा लेख – संपादक*

मागील लेखात सांगितल्याप्रमाणे जीनान या शहरात जागोजागी अनेक झरे आहे. त्यातील बाडुटू झरा हा फारच प्रसिद्ध आहे. त्याच्या भोवती बगीचा निर्माण केलेला आहे. याखेरीज सुंदर सुंदर इमारती उभ्या केल्या आहेत. कधीकाळी ते राजकीय व्यक्तीच्या राहण्याचे ठिकाण होते. आता मात्र ते शहरातील एक प्रेक्षणीय स्थळ म्हणून नावाजलेले आहे. जीनान शहरात येणारी व्यक्ती या झऱ्याला भेट देतेच. या झऱ्याचे महत्त्व लक्षात घेऊन स्पर्धेच्या आयोजकांनी स्पर्धेतून वेळ काढून या झऱ्याला भेट आयोजित केली होती. झऱ्याच्या परिसरात प्रवेश करण्यासाठी शुल्क भरावे लागते. आमच्या यजमानांनी शुल्क भरून तिकीट घेतले व झरा आणि बाग यांचा फेरफटका मारण्यास सांगितले.



**बाडुटू झऱ्याचे प्रवेशद्वार**

बाडुटू झऱ्याच्या परिसरात प्रवेश केल्याबरोबर आपल्या लक्षात येते ती सुंदर बाग. परिसरात अनेक लहानलहान नाले आहेत. या नाल्याच्या दुतर्फा सुंदर झाडे लावलेली आहेत. शोभेच्या लहान झाडांबरोबरच मोठमोठे वृक्षदेखील तेथे आढळतात. एका प्रवेशद्वारातून आपण आधी आत जातो; काही अंतर पुढे गेल्यावर आणखी काही प्रवेशद्वारांतून आत जावे लागते. असे करीत करीत आपण झऱ्याजवळ पोहोचतो. जेथे झऱ्याचे पाणी येते तेथे एक मोठा हौद बांधलेला आहे. झऱ्याचे पाणी वेगाने या हौदात येताना आपल्याला पाहायला मिळते. हौदाच्या सर्व बाजूंनी चांगल्या पायऱ्या बांधलेल्या आहेत. त्यामुळे एखाद्याला पाण्यात उतरायचे असेल तर ती इच्छादेखील पूर्ण करून घेता येते. आम्ही गेलो ते दिवस उन्हाळ्याचे होते. बाहेरचे तपमान २४ ते २५ अंशाच्या आसपास असेल. परंतु हौदातील पाण्याचे तापमान मात्र याहून कमी होते. पाणी हाताला गार लागत होते. या पाण्यात रंगीबेरंगी मासे मनसोक्त पोहत होते.



**नाल्याच्या दुतर्फा असलेली वनश्री**

सर्व गुन्हे माफ होतात, असे न्यायालय, म्हणजे आईचे हृदय.

हौदाच्या चारी बाजूंनी चार प्रकारचे बांधकाम केलेले आहे. एका बाजूला एक मंदिर आहे. त्यात इतर ठिकाणी असतात तशा बुद्धाच्या मूर्त्या आहेत. दुसऱ्या बाजूला एक प्रदर्शन आहे. तेथे रंगकाम आणि कलाकुसरीच्या वस्तू ठेवलेल्या आहेत. त्याच्या जवळच बांबूचे एक मोठे वन आहे. वेगवेगळ्या प्रकारची लहानमोठ्या आकाराची बांबूंची झाडे तेथे आपल्याला पाहायला मिळतात. एका बाजूला अश्मारण्य आहे. तेथे वेगवेगळ्या आकारचे दगड रचून ठेवलेले आहेत. एकंदरित हा परिसर वेगवेगळ्या वस्तूंनी परिपूर्ण असा आहे. त्यामुळे येथे वेळ कसा निघून जातो ते कळतच नाही.



**बागेतील अश्मारण्य**

कोणत्याही गावातील निवृत्त मंडळींना वेळ कसा घालवावा हा मोठाच प्रश्न असतो. ही सगळी मंडळी या बागेत वेळ घालवायला येतात. काही मंडळी बागेच्या रम्य परिसरात बाकावर पहुडतात तर काही मंडळी खेळाचा डाव रंगवतात. ते नेमका कोणता खेळ खेळतात हे कळू शकले नाही. परंतु आपल्या खेळात ते चांगलेच गर्क झालेले मात्र आढळले.



**खेळात गर्क झालेली वयस्कर मंडळी**

शानडाँग प्रांतात फारसा पाऊस पडत नाही. तरीही एवढी हिरवळ आणि एवढे झरे कसे? असा प्रश्न पडल्यावाचून राहात नाही. या प्रश्नाचे उत्तरही तेवढेच उद्‌बोधक आहे. परिसरात पाऊस पडत नसल्याने शेतकऱ्यांना सतत दुष्काळाला सामोरे जावे लागत असे. यावर मात करण्यासाठी पिवळ्या नदीचे पाणी अडविण्याचे ठरविण्यात आले. नदीचे पाणी केवळ अडवायचे नाही तर प्रांतात खेळवायचे अशी योजना आखण्यात आली. या प्रांतातून नदी पश्चिमेकडून पूर्वेकडे वाहते व शेवटी ती पॅसिफिक समुद्राला मिळते. ही नदी समुद्राला जाऊन मिळण्यापूर्वी तिला अडविण्यात आले आणि दक्षिण-उत्तर कालवे काढून नदीचे पाणी प्रांतभर खेळविण्यात आले. याचा परिणाम असा झाला, की जमिनीतील पाण्याची पातळी वाढली. त्यामुळे शेतातील पिके चांगली यायला लागली. त्याचबरोबर जमिनीतील झऱ्यांमधून पाणी इकडे तिकडे जाऊ लागले. अशा झऱ्यांमधूनच विहीरीला पाणी मिळत असते. काही ठिकाणी हे झरे जमिनीच्या वर आले. त्यामुळे सगळीकडे पाणीच पाणी झाले.

चुकणे हे मानवाचे लक्षण आहे. पण मुद्दाम चुका करणे हे सैतानाचे लक्षण आहे.



**हौदाजवळ मनसोक्त आनंद घेणारे पर्यटक**

योग्य योजना आखून आणि त्याची अंमलबजावणी करून आपल्या समस्येवर मात कशी करता येते याचे हे चांगले उदाहरण आहे. पिवळ्या नदीचे पाणी प्रांतात खेळविल्याने केवळ शेतपिकांचीच समस्या सोडविली नाही, तर पिण्याच्या पाण्याची समस्यादेखील सोडवायला मदत झाली. याखेरीज बाडुटू झऱ्यासारखी प्रेक्षणीय स्थळे निर्माण झाली. बाडुटू हे जीनान शहरातील अनेक झऱ्यांपैकी एक आहे. असे अनेक झरे शहरात आणि शहराच्या आजूबाजूला आपल्याला पाहायला मिळतात.



**झरा जवळून पाहता यावा यासाठी बांधलेले छत्र**

एखाद्या ठिकाणी झरा असेल तर त्याचे प्रेक्षणीय स्थळात रूपांतर कसे करता येते हेदेखील आपल्याला येथे पाहायला मिळते. झऱ्याच्या भोवती सुंदर बाग करून आणि मंदिराची उभारणी करून परदेशी पर्यटकांना आकर्षित करता येते, हे चिनी मंडळींनी चांगले ओळखले आहे. म्हणूनच ४० युआनचे म्हणजे सुमारे २९० रुपयांचे तिकीट घेऊन मोठ्या संख्येने पर्यटक येथे येतात असे दिसते.



**झऱ्याच्या पाण्यात मनसोक्त पोहणारे मासे**

**–डॉ. सुधाकर आगरकर**
सी–१४, विसावा वैभव नगरी,
कल्याण शीळ रोड,
काटई, ता. कल्याण
जि. ठाणे – ४२१२०४

●●●

***कोणतेही ध्येय गाठायचे, ती आपली कुवत लक्षात घेऊन ठोस उद्दिष्टे निश्चित करणे. त्यांच्या पूर्ततेसाठी ठोस कृति योजना आखणे आणि चिकाटीने ती प्रत्यक्षात उतरविणे, हे आवश्यक असते. तहान लागली की पाणी मिळतेच. पण, तहान लागत नाही ही खरी समस्या आहे आणि तहान कशी लागेल, या प्रश्नाला उत्तर नाही.***

**– संकलित**

विद्यार्थी दागिने–कपड्यांनी शोभून दिसत नाही, तर तो विद्येनेच शोभून दिसतो.

# श्रीमत् भगवद् गीता - अध्याय आठवा
## विषय : अक्षर ब्रह्म योग

*कै. शंकरराव मठांनी दिशासाठी दिलेल्या लेख मालेतील हा ८ व्या अध्यायावरील लेख. या लेखाच्या माध्यमातून कै. मठांना आम्ही विनम्र अभिवादन करतो - संपादक*

**श्लोक १ ते ८ ब्रह्म, अध्यात्म, कर्म आदि विषयांवरील अर्जुनाचे सात प्रश्न**

अर्जुन म्हणाला - हे पुरुषोत्तमा ते ब्रह्म काय आहे? अध्यात्म काय आहे? कर्म काय आहे? अधिभूत म्हणजे काय? आणि आधिदैव कशाला म्हणतात? हे मधुसूदना येथे या शरीरात अधियज्ञ कोण? आणि कशा प्रकारे आहे? आणि अन्तकाली संयमी योगी ईश्वराला कसे ओळखतात? श्रीकृष्ण म्हणतो - अविनाशी श्रेष्ठ तत्त्व ब्रह्म आहे. त्याच्या अस्तित्वाचे नाव कर्म आहे. नाशिवंत वस्तुभाव, त्याला अधिभूत म्हणतात. चेतन तत्वाला अधिदैवत म्हणतात. प्रत्येक देहात मी हा भावच जो ईश्वरभाव त्याला अधियज्ञ म्हणतात.

जो अंतकाळी ईश्वराचे स्मरण करीत देह सोडून जातो तो ईश्वरीय भावाला प्राप्त होतो. यात संशय नाही. हे कुन्तिपुत्रा ज्या भावनेचे स्मरण करीत अंती देह सोडतो तो त्या भावालाच प्राप्त होतो. कारण नेहमी त्याच भावाने तो युक्त असतो. म्हणून सर्वकाळी ईश्वराच्या ठिकाणी मन आणि बुद्धी अर्पण कर. ईश्वराचे स्मरण कर आणि युद्ध कर. असे केल्याने निःसंशय तू ईश्वरालाच पावशील. हे पृथुपुत्रा अभ्यास योगाच्याद्वारे स्थिर झालेल्या चित्ताने ईश्वराचे ध्यान केल्यास साधक दिव्य परमपुरुषाला प्राप्त होतो.

**श्लोक ९ ते २२ भक्तियोग - सविस्तर उहापोह.**

ईश्वर सर्वत्र आहे, तो सर्वज्ञ आहे. तो पुरातन, निर्यता, सूक्ष्माहूनही सूक्ष्म, सर्वांचे धारण पोषण करणारा, अचिंत्य स्वरूप, अहंकार अतीत, सूर्यासारखा तेजस्वी आहे. अशा ईश्वराचे प्रयाणकाली स्थिर मनाने भक्तियुक्त अंतःकरणाने आणि योग बलाच्याद्वारे दोन्ही भुवयांमध्ये प्राणाला स्थापन करून स्मरण करतो, तो त्या दिव्य परमपुरुषा समीप पोचतो. वेद जाणणारे त्याला अक्षर म्हणतात. भोगपराङ मुख यति ज्याच्या ठिकाणी प्रवेश करतात, ब्रह्मचारी त्याच्या प्राप्तीसाठी ब्रह्मचर्य व्रताचे आचरण करतात. त्याचे वर्णन अत्यंत संक्षेपाने तुला सांगतो. इंद्रियाच्या सर्व द्वारांचे संयमन करून मनाला हृदयाच्या ठिकाणी थोपवून, मस्तकात आपला प्राण नेऊन योग धारणावस्थेत साधकाने राहावे. मग ॐकार रूपी एकाक्षर ब्रह्माचे उच्चारण करीत, तसेच ईश्वराचे चिंतन करीत असा साधक देह सोडतो तो परमश्रेष्ठ गती प्राप्त करतो.

हे अर्जुना, दुसरे काहीही नाही अशी चित्तांची भावना करून जो ईश्वराचे स्मरण करतो त्या नित्ययुक्त योग्याला ईश्वर सुलभतेने प्राप्त होतो. परमसिद्धीला प्राप्त झालेले महात्मे ईश्वराला प्राप्त झाल्यानंतर पुनःदुःखाचे स्थान अशा अशाश्वत जन्माला प्राप्त होत नाहीत. हे अर्जुना ब्रह्मलोकापासून जितके लोक आहेत तेथून पुनः परतावे लागते. हे कुन्तिपुत्रा ईश्वराजवळ आल्यानंतर पुनः जन्म घ्यावा लागत नाही.

जे अहोरात्र प्रमाण जाणणाारे आहेत ते लोक हजार युगांचा एक ब्रह्माचा दिवस आणि हजार पुत्रांची एक ब्रह्माची रात्र होते असे म्हणतात. ब्रह्माचा दिवस प्रारंभ होताना सर्व व्यक्त पदार्थ अव्यक्त प्रकृतींपासून उत्पन्न होतात आणि पुनः रात्रीच्या प्रारंभी त्याच अव्यक्त प्रकृतीत लीन होतात.

हे अर्जुना – तोच हा भूतांचा समुदाय परतंत्रतेने वारंवार उत्पन्न होऊन रात्र होताच लीन होतो आणि दिवस प्रारंभ झाल्यावर उत्पन्न होतो.

जो सर्व भूते नष्ट झाली तरी नष्ट होत नाही, जो त्या अव्यक्ताहून भिन्न अदृश्य आणि सनातन असा दुसरा एक भाव आहे. तो दुसरा पदार्थ आहे. तो अव्यक्तभाव अक्षर म्हणून प्रसिद्ध आहे. त्यालाच परम गति म्हणतात. ते प्राप्त केल्यावर ज्ञानी परत फिरत नाहीत. ते ईश्वराचे परमधाम आहे. हे पार्था, सर्व भूते ज्याच्या ठिकाणी आहेत आणि ज्याने हे सर्व व्याप्त झाले आहे. तो परम पुरुष अनन्य भक्तीनेच प्राप्त होतो.

**श्लोक २३ ते २८ शुक्ल व कृष्ण गती**

हे भरतश्रेष्ठा, ज्यासमयी प्रयाण केले असता योगी लोक परत येत नाहीत आणि ज्यासमयी प्रयाण केले असता परत येतत तो समय मी तुला सांगतो. अग्नी, ज्योती, दिवस शुक्ल पक्ष, उत्तरायणाचे सहा महिने यावेळी प्रयाण करणारे ब्रह्मज्ञानी ब्रह्माला प्राप्त होतात. धूर रात्र, कृष्णपक्ष, दक्षिणायनाचे सहा महिने यावेळी जाणारे कर्मयोगी चंद्राच्या ज्योतीला प्राप्त होऊन परत येतात. जगताचे शुक्ल आणि कृष्ण नामक मार्ग सनातन आहेत. एकापासून परत येत नाहीत आणि दुसऱ्यापासून पुनःपुनः परत यावे लागते.

हे अर्जुना, हे दोन्ही मार्ग जाणणारा योगी केव्हाही मोहग्रस्त होत नाही. म्हणून तू सर्वकाळी योगयुक्त हो. योगी याला जाणून वेदामध्ये, यज्ञामध्ये, तमाममध्ये, दानामध्ये जे पुण्यफळ सांगितले आहे. त्या सर्वांच्या पलीकडे जाऊन आद्य आणि परम उच्च अशा स्थानाला प्राप्त होतो.

आठव्या अध्यायाचा विषय 'अक्षर ब्रह्मयोग' असा आहे. अविनाशी ब्रह्माशी एकरूप होण्याची युक्ती या अध्यायात सांगितली आहे. प्रत्येक प्राणी अक्षर ब्रह्माशी तद्रूप होऊन जाण्यासाठीच या जगात आला आहे. ज्या उपायाने ते ध्येय साध्य होईल तो समजून घेणे योग्य होईल.

**अक्षर ब्रह्माचे स्वरूप –**

'अक्षरं परमंब्रह्म' या तीन शब्दांत त्याचे स्वरूप सांगितले आहे. ब्रह्म म्हणजे महानशक्ती युक्त तत्त्व, ते सर्वापेक्षा विशाल, सर्वाहून श्रेष्ठ, सर्व समर्थ आणि सर्वांच्या पलीकडे आहे. अक्षर याचे दोन अर्थ संभवतात. १) अविनाशी २) डोळे ज्यामुळे रमतात. अ+क्षर, अक्ष+र अशा प्रकारे ब्रह्म मूर्ती मूर्त आहे. द्वे वाव ब्रह्मणः रुपे मूर्तंच अमूर्तंच (बृ.आ.२/३/१) आमच्या डोळ्यांनी जे रूप दिसते ते परमात्म्याचे अगर पर ब्रह्माचेच आहे. विश्वाचे रूप दुसऱ्या कोणाचे नसून ह्याच आत्म्याने धारण केले आहे.

**ब्रह्माचा स्वभाव** – आपला भाव, आपला धर्म आणि तो कधीही बदलत नाही, यालाच अध्यात्म म्हणतात.

**ब्रह्माचे कर्म** – भूत-भाव-उद्‌भव भूतांची अखंड उत्पत्ती होत असते. त्यासाठी त्याच्या शक्तीचे प्रदान (विसर्ग) होत आहे. हाच ब्रह्माचा यज्ञ. प्राणी मात्रांचे जीवन उंचावणे, ते विकसित उन्नत होईल हे पाहणे, यासाठी सामग्री गोळा करण्याची निश्चित आखणी करणे, बंधनांतून निवृत्त होणे, जीवनाच्या विकासाठी प्रकाशाचा मार्गी दाखविणे याला विसर्ग व्यत्न म्हणतात. तेच कर्म संज्ञेस पात्र आहे.

**क्षरभाव** – उत्पन्न झालेला प्रत्येक पदार्थ विनाशाकडे जात आहे. अधिभूतं क्षरोभावो। नाशवंत तत्त्व.

**अधिदैवत** – पुरुष-अक्षर तत्त्वाला पुरुष म्हणतात. सप्तभिःधातुभिःपूर्यते इति पूः शरीरम्। त्याचा स्वामी आत्मतत्त्व यालाच देही वा शरीरी म्हणतात.

**अधियज्ञ** – या देहात अधियज्ञ 'मी' आहे 'अहं' आत्मा, चेतन तत्त्व आहे, तेच म्हणते येथे मी आहे. तोच या जीवन यज्ञाचा

---

साबणाने धुतलेल्या कपड्यांपेक्षा प्रेमाने स्वच्छ केलेल्या अंतःकरणाची उज्ज्वलता अधिक खुलून दिसते.

अधिष्ठाता. या यज्ञाचा यजमान (यज्ञस्य आत्मा) आत्मा आहे.

१) अक्षर ब्रह्म, क्षर ब्रह्म हाचा परम पुरुषासाठी श्रेष्ठ कर्म करतो, हाच चैतन्य रूपाने विश्व व्यापून आहे, हाच जीवनरूप मानवी यज्ञाचा अधिष्ठाता, हाच जीवतत्त्व, अशा सहाप्रकारे परब्रह्म अनुभवाला येतो. यथायोग्य ज्ञानासाठी समजून घेणे आवश्यक. तरच आपल्या शक्तीचे नीट ज्ञान जीवात्म्यास होईल. थोडक्यात - १. अक्षर-अविनाशी भाव (ब्रह्म) २. क्षर विनाशीभाव (अधिभूतं) ३. स्वभाव - स्वीयभाव (अध्यात्म) ४) कर्म - उच्च होण्याचा भाव (उत्भव) विसर्गः ५) पुरुष-शरीरात राहण्याचा भाव (अधिदैवत) ६)यज्ञ- यज्ञात मीपणे राहण्याचा भाव (अधियज्ञ) हे सारे ब्रह्माचे भाव आहेत. प्रत्येक मानव हा परमात्म्याचा अंश असल्याने त्याच्या विश्व व्यापक कर्मातील आपले कर्म एक अंश समजून परमात्म समर्पण बुद्धीने निष्काम कर्म करण्यानेच आपले कर्तव्य पालन योग्य पद्धतीने होत आहे हे ध्यानात येईल, तर योग्य होईल.

जो विश्वधर्माला अनुकूल तोच मनुष्याचा धर्म होय आणि जो प्रतिकूल तो अधर्म होय. आपल्या सुखाच्या भ्रमाने विश्वधर्माचा विरोध करण्यास निःसंशय अधर्म करतो. प्रत्येक मानवाने आपल्याला विश्व सेवेला पात्र करावे असेच गीतेचे प्रतिपादन आहे.

**मनोधर्म** - मनाची शक्ती मोठी विलक्षण आहे. मन ज्या गोष्टीचे चिंतन करते, तसे ते होते. मन ज्या कोणत्या भावाचे ध्यान करते तसे ते होते, म्हणजे त्या भावानी युक्त होते मनच कल्पवृक्ष आहे. जी कल्पना केली जाते ती फलद्रूप होते मनाचा उपयोग फार सावधपणे केला पाहिजे. परमेश्वरच सर्वात श्रेष्ठ आहे. या श्रेष्ठ विचाराने मनुष्याचे मन श्रेष्ठ व्हावे याच हेतूने ईश्वर स्मरणाचा विषय मनुष्याच्या समोर ठेवला आहे.

**तद्भाव भावित** - मनुष्याचे मन विचार-विषयाच्या प्रभावाने प्रभावित होते आणि तद्रूप होते. मनुष्याच्या उन्नतीची ही किल्ली आहे. एकाग्र चित्त होऊन हा अभ्यास केल्यास मनशुभ संकल्प धारण करू शकते. शुभ व्हावे इच्छिणारांनी शुभ संकल्प केले पाहिजेत.

**परमपुरुष** - सर्वज्ञ (कवी) सदैव विद्यमान (पुरा आणि नवः) सर्वांचा शासक (अनुशासिता) सूक्ष्माहून सूक्ष्म (अणोः अणीयान्) सर्वांचा धारक (धाता) चिंतनाच्या पलीकडचा (अचिंत्य रूप) तेजस्वी (आदित्यवर्णः) अंधाराच्या पलीकडे (तमसः परः) असा परम पुरुष आहे याचे जो ध्यान करील, त्याच्या मनात या गुणांची धारणा झाल्याने त्याचे मन या गुणांनी युक्त होईल. म्हणजेच त्याची प्राप्ती होईल. ज्याच्या ठिकाणी परम पुरुषाचे गुण स्थिर झाले तो परम पुरुषच होतो.

**प्रयाणकाळ** - हे मृत्यू समयीचे नाव आहे. त्यावेळी या परम पुरुषाचे ध्यान योग्य पद्धतीने होण्यासाठीच याचे ध्यान करण्याचा सतत अभ्यास केला पाहिजे. मनात स्वैर विचार येतात, ते मनुष्याला पतित करतात. मन अवश होऊन काहीना काही विषयाचे चिंतन करतेच. मग त्याला उत्तम पुरुषाचे चिंतन करावयास का लावू नये? ईश्वरीय गुणांचा विचार करीत राहिल्याने चित्त शुद्ध होईल. परम पुरुषाच्या ठिकाणी जे गुण आहेत ते आपल्या अंगी अंशतः का होईना कसे आणता येतील याचा ध्यास घेण्याने ईश्वराचे सदाचे स्मरण राहील व प्रयाणकाळी देखील त्याच्या स्मरणानेच इहलोकीचा निरोप घेता येईल.

हे विश्व काळ आणि दिशा यांनी युक्त आहे. काल प्रचंड आहे. त्याचा विचार गीतेने केलेला आहे. कृत, त्रेता, द्वापर आणि कली ही चार युगे मिळून एक महायुग होते. अशी एक हजार महायुगे मिळून ब्रह्माचा एक दिवस होतो आणि तितक्याच काळाची ब्रह्माची एक रात्र होते. मनुष्याचे आयुष्य शंभर वर्षाचे आहे. एका युगातच मनुष्य

लाखो वेळा पुनः पुनः जन्म घेत असतो. ब्रह्मदेवाच्या दिवसात किती येरझाऱ्या होतील याची गणतीच करावयास नको इतकी काळाची सत्ता अमर्याद आहे. या अनंत काळात मनुष्यासाठी एक बिंदू इतकेही स्थान नसताना मनुष्य मात्र आपल्या शंभर वर्षे आयुष्याचा गर्व बाळगतो. ब्रह्मदेवाच्या आयुष्याच्या तुलनेत मानवी आयुष्य अत्यल्प आहे, हे ध्यानात ठेवणे हे योगय. हे भान ठेवून दैनिक अगर कालिक विश्वरूपात आपले स्थान शोधल्यास आपण नगण्य असल्याचे ध्यानात येईल. त्यामुळे आपला अहंकार नाहीसा होईल. अहंकार नाशा नंतरच आत्म समर्थनाची भूमिका निर्माण होते आणि आत्मोद्धाराचा मार्ग खुला होतो. भगवंताच्या इच्छेत आपली इच्छा मिळविणे आणि ईश्वराच्या कार्यात आपले कार्य समर्पण करणे यानेच मानव स्तःला कृतार्थ करू शकतो. नाश होत असणाऱ्या भूतमात्रात जे अविनाशी सत् तत्व आहे त्याला प्राप्त करतो व धन्य होतो हा परमपुरुष अनन्य  भक्तीनेच प्राप्त होतो. अनन्य या भक्त्यालभ्यः।

**दोन मार्ग –**

एक शुद्ध मार्ग (शुक्ल) दुसरा अशुद्ध (कृष्ण). जगातील सर्वच माणसे याच दोन मार्गानी जात असल्याने त्याचाही विचार गीतेने केलेला आहे. शुक्ल कृष्णे गती होने जगतः शाश्वते मते।८.२६ ही शुक्ल आणि कृष्ण गती या जगात शाश्वत काळापासून चालत आली आहे. यांनाच पाप, पुण्याचे मार्ग असेही म्हणतात. पुण्य मार्गाने सिद्धी प्राप्त होते. पाप–अशुद्ध मार्ग असल्याने पुनरावृत्ती होते. जगात दोन्ही स्वभावाची मंडळी असतात. सरळ व कुटिल. शुद्ध सरळ मार्गाने चालणारा माणूस निश्चित स्थानी पोहोचतो आणि अशुद्ध मार्गाने चालणारा माणूस इष्ट स्थानी पोचत नाही. म्हणून शुद्ध पक्षात–प्रकाशाच्या पवित्र मार्गाने जाणारा उच्चतर गतीला प्राप्त होतो. (उत्–तर–अयन) उत्तरायण हा काल गतीचा भागही आहे. अग्नी, प्रकाश, दिन, शुद्ध पक्ष, उत्तरायण हे शब्द शुद्ध मार्गाचे सूचक आहेत. याचप्रमाणे धूम, रात्र, वद्यपक्ष दक्षिणायन हे शब्द आसुरी मार्गातील लोकव्यवहाराचे सूचक आहेत. दैवी आणि आसुरी हे शब्दभाव सनातन असल्याने सत् पक्ष, असत् पक्ष हेही सनातन आहेत. यांना वेदांतून उपनिषदांतून देवपथ व पितृपथ अशी नावे आहेत हे दोन शब्दच या मार्गाचे द्योतक आहेत. एका मार्गाने गेल्यास शुद्धता दुसऱ्या मार्गाने गेल्यास कृष्णता– काळिमा लागतो. भोगाच्याच मागे लागून जीवन व्यीत करणारे कृष्णमार्गाने जातात. स्वावलंबन आणि स्वाधीनता याच्या मागे जीवन घालविणारे ते शुद्ध मार्गाने जाणारे होत. असे भिन्न परिणाम या दोन अर्थाने जाणाऱ्यांचे होतात. हे ज्याला नीट कळले तो केव्हाही कसे वर्तन करावे यांविषयी मोहीत होत नाही. तो भोगात न सापडता त्यागाच्या शुद्ध मार्गाने वेदाद्ययन, या, तप, दान याने पुण्य संपादन करतो. याहीपेक्षा कित्येक पटीने अधिक निष्काम भवनेने कर्म करणाऱ्याला प्राप्त होतो. हे ओळखून तसे आचरण करण्याचा प्रयत्न करतो. आणि या स्वातंत्र्याच्या (मुक्तीच्या) मार्गाने जाऊन परमपद प्राप्त करून घेतो. या मार्गासंबंधीचा विचार साकल्याने करावा व प्रत्येकाने उच्चपद प्राप्तीसाठी सतत प्रयत्नशील रहावे, यातच मानवी जीवनाचे रहस्य दडलेले आहे.

**योगबल** – प्रयाण कलीभक्तियुक्त अंतःकरणाने, स्थिर चित्ताने, योग प्रक्रियेद्वारे प्राण भुवयांच्यामध्ये स्थिर करून जो या परात् पर पुरुषाचे ध्यान करतो आणि देहाचा त्याग करतो तो त्या दिव्य पुरुषाला प्राप्त होतो. ही मरण काळची सिद्धता आहे. जो सिद्ध पुरुष योग साधन करतो, प्राण ज्याच्या आधीन झाला आहे तो याप्रमाणे योग बळ प्राप्त करू शकतो. सर्व साधारण मनुष्याला हे भाग्य लाभत नाही. प्रत्येक मनुष्य अल्प अंशाने सर्व करू शकतो. पण सिद्धीपर्यंत अभ्यास करणे प्रत्येकाच्या हाती नाही. जो जितके करु शकतो तितके त्याने अवश्य करावे. ज्याला हा प्राण निरोध शक्य होत नाही त्याने दुसरा अभ्यास योग अवश्य करावा. परमेश्वराच्या गुणांचे सतत ध्यान करून ते

गुण अंगी बाणवण्याचा प्रयत्न करण्याचा सतत ध्यास घेण्यानेही या अभ्यासयोगाने अंतकाळी परमेश्वराचे स्मरण राहील व कृतकृत्य होता येईल.

**महात्मा** – अशा प्रकारे, साधक परमेश्वराजवळ पोचतो. तो महात्मा होतो. याच्यापूर्वी त्याचा आत्मा अल्प होता. परमेश्वराच्या पूर्णतेशी त्याचे मिलन झाल्याने तो पूर्णात्मा किंवा महात्मा बनतो आणि त्याला परमपद प्राप्त होते. उन्नतीची ही एक अंतिम अवस्था आहे. ही अवस्था प्राप्त झाल्यानंतर दुःखमय पुनर्जन्म वारंवार प्राप्त होत नाही. जोवर हा अल्पात्मा असतो म्हणजे याची दृष्टी भेदभावाने युक्त असते, दुसरेपणाच्या कल्पनेने युक्त असते. तोपर्यंत याला पुनर्जन्म घ्यावाच लागतो. ज्यावेळी याच्या जीवातून भेदभाव नष्ट होतो, त्याच वेळी तो महात्मा आणि अनन्यचेता होतो.

**ब्रह्मदेवाचा दिवस**

कृतयुग ४००० वर्षे, त्रेता युग ३००० वर्षे द्वापार युग २००० वर्षे कलियुग १००० वर्षे एकूण १०,००० वर्षे या प्रत्येक युगाचा संधिकाळ असतो. संधिकाळ वर्ष प्रमाण – कृत–८०० वर्षे त्रेता ६०० वर्षे द्वापार ४०० वर्षे कली २०० वर्षे एकूण २००० वर्षे चार युगाचा एकूण काल १२००० वर्षे. यालाच एक महायुग म्हणतात. ही सारी दैवी वर्षे होत. याच्या बरोबरीने मानुषी वर्षाचे प्रमाण असे आहे. मानवी ३६० दिवस १ दैवी दिवस ३६० मानवी वर्षे १ दैवी वर्ष महायुग १२००० ह्न ३६० = ४३,२०,००० मानवी वर्षे.

७१ महायुगे = १ मन्वंतर, १४ मन्वंतरे व १५ संधिकाळ = १ ब्रह्मदेवाचा दिवस. १००० महायुगे

१४ मन्वंतर ह्न ७१ = ९९४ महायुगे १५ संधिकाळ ह्न ४ = ६० युगे म्हणजे ६ महायुगे

९९४ + ६ = १००० महायुगे. एक महायुग ४३,२०,००० मानवी वर्षे मानवी वर्षाप्रमाणे

१००० महायुगे = एक दिवस. १००० महायुगे = १ रात्र अेक अहोरात्र म्हणजे ४३,२०,००० ह्न२ह्न१००० =८,६४,००,००,००० इतकी मानवी वर्षे हे ब्रह्मदेवाच्या दिवस रात्रींचे प्रमाण आहे. सहस्त्रयुग पर्यंत अहः। सहस्त्रयुग पर्यंत रात्र मिळून अहोरात्र विदोजनः। ही काल गणना मनुस्मृति, निरुक्त, महाभारत शान्तिपर्व, सूर्यसिद्धान्त आदी ग्रंथातून अशीच सांगितलेली आहे.

**कै. शं. बा. मठ**

●●●

**अस्थमा**

घरामधील धुळीतील अतिसूक्ष्म कीटक हे अस्थमाचे प्रमुख कारण आहेत. हे काही काळापासून संशोधकांना माहीत असले तरी आता हे कीटक जी टाकाऊ जीवनसत्वे धारण करतात ती अॅलर्जीस (रोगप्रवणतेस) कारणीभूत ठरतात. संशोधकांनी बरेच संशोधन करून त्यांच्या क्रियेस प्रतिबंध घालण्याचे तंत्र शोधले आहे. त्यामुळे त्यांना आशा आहे की ते अस्थमा प्रतिबंधक असे अगदी नवे औषध तयार करू शकतील. हे औषध या रोगांच्या लक्षणांवर उपाय करणारे ठरेल.

यावर मूळ महितीपट क्लाइव्ह रॉबिन्सन व डेव्हिड गॅरॉड (लंडन विद्यापीठ व मँचेस्टर विद्यापीठ) यांनी तयार केला असून त्यात ही प्रक्रिया विशद केली आहे. यासंबंधीचे संकेतस्थळ :

www.youtube.com@watch?=hS3t PhElrr3

संदर्भ : वेलकम न्यूज, अंक ६८ हिवाळा २०११ ब्लॉग अँड फिल्म, पृ.२२

# सिद्धहस्त चतुरस्त्र गायक - जोडरागांचा बादशहा संगीत भूषण पं. राम मराठे

*संगीत भूषण राम मराठेंचे संगीत कलेला असणारे योगदान लक्षात न घेता ठाण्याच्या सांस्कृतिक इतिहासाचा विचारच शक्य नाही .त्यांचे चिरंजीव व प्रसिद्ध गायक श्री. मुकुंदराव मराठे यांनी या लेखाद्वारे दिशाला दिलेल्या सहकार्याबद्दल आभार - संपादक*

अखिल भारतीय कीर्तीचे घरंदाज गायक आग्रा, ग्वाल्हेर आणि जयपूर अशा तीनही घराण्यांची घराणेदारी, तालीम मिळालेले व त्यातून आपली एक स्वतंत्र, तरीही परंपरागत गायकी निर्माण करणारे शास्त्रीय गायक, बालपट (चित्रपट) संगीत रंगभूमीवरील गायक नट, संगीतकार, चित्रपट पार्श्व संगीत गायक, उत्कृष्ट डावखुरे तबलावादक, (उ. मिरखवाँ बाज!), बंदिश रचनाकार , आकाशवाणीचे Top Grade अति उच्च श्रेणी शास्त्रीय गायक म्हणून तमाम रसिकांमधे मान मिळवलेले, अत्यंत निगर्वी, विनम्र, शांत स्वभावाचे असे महान गायक म्हणजे अर्थातच, संगीतभूषण पं. राम मराठे! गानगुरु सवाई, गंधर्वानंतर रामभाऊ हे नाव फक्त पं. रामभाऊ मराठे हेच कायम स्मरणात रसिकांच्या आहे आणि राहील!



**पं. राम मराठे**

रामभाऊंनी किमान ५००० (पाच हजार)हून अधिक नाट्यप्रयोग आणि किमान ३ ते ३.५ हजार मैफली भारतभर केल्या! त्यांची गायनाची मैफल म्हणजे पंचपक्वानाचं भरपेट भोजनच जणू! शास्त्रीय, रागदारी ख्याल गायकी, जोडराग, अनवट राग, सर्व प्रचलित राग, ठुमरी, तराणा, नाट्यसंगीत, अभंग, हिंदी भजन, चतुरंग, विविध भैरवी आणि शेवटी संपूर्ण वंदे मातरम् अशा अनेकविध गान प्रकारांनी ती समृद्ध होत असे.

त्यांनी आपल्या आयुष्याच्या अगदी अखेरच्या मैफलीपर्यंत पांढरी-४ (प्रसंगी काळी-३ देखील!) काळी ऽ ऱ्हा स्वर उंच पट्टीमधे ते सादर करत असत. पं. मानिदंथन पटवर्धन (१९४४ पासून) आणि पं. एस्. व्ही. पटवर्धन ह्या दोहोंबरोबर हार्मोनियम, तबल्याच्या संगतीने ज्या रसिकांनी बैठकी अनुभवल्या आहेत, त्या तर अक्षरशः अविस्मरणीय आणि संपूर्ण मैफलीमधे उपज अंगाने नावीन्यपूर्ण गायकी सादर करत. कायम 'चैतन्य' ठेवण्याचे विलक्षण सादरीकरण, प्रचंड मेहनतीने, रियाजाने आग्रा, ग्वाल्हेर, जयपूर अशा तीनही घराण्यांची गायकी अनेकविध मान्यवर गुरुंकडून आत्मसात करून, स्वतःची अशी परंपरायुक्त घरंदाज गायकी त्यांनी लोकप्रिय केली.

विलक्षण ताकदीने, क्षमतेने (प्रचंड स्टॅमिना) आणि प्रचंड इच्छाशक्ती असलेल्या पं. रामभाऊंची मैफल रात्री ९.३० ते पहाटे ४ पर्यंत चालत असे. एकाच दिवसामध्ये ४ ते ४.३० तासांचे, २ वा ३ संगीत नाट्यप्रयोग करून, रात्री संपूर्ण मैफल सादर करण्याची विलक्षण शारीरिक क्षमता असलेला आणि कुठचेही खाण्यापिण्याचे पथ्य न सांभाळणारा असा हा अजोड गायक होता.

बालगंधर्व, मास्टर कृष्णरावांची लडिवाळ गायकी, जयपूर घराण्याच्या लय-पेचबद्ध हमसानयुक्त तानपलटे,

ग्वाल्हेर गायकीची अत्यंत लयदार, आग्रा गायकीची भारदस्त गायकी, लयदार तिहाया तसेच भावप्रधान गायन , राग शुद्धता आणि संपूर्ण मैफलीला परमोच्च बिंदूपर्यंत नेऊन ठेवणारी दाणेदार, पल्लेदार, चपळ अशी अत्यंत सुस्पष्ट अशी जलद लयीतील तानक्रिया, गमकेच्या ताना, खटकेच्या ताना आणि अत्यंत अनोखी अशी रियाजाने हुकुमत मिळवलेली दमछाक पूर्ण ताकदीची 'मुखबंदी' तान!

मास्टर मनहर बर्वे, पं. वामनराव सडोलीकर, पं. मिराशीबुवा, मास्टर कृष्णराव फुलंब्रीकर, पं. गुणिदास अर्थात जगन्नाथबुवा पुरोहित, उस्ताद रिसायतहुसेन खाँ-आग्रावाले, गायनाचे भास्करबुवा बखले यांचे शिष्य-बाबूराव काळे, पं. बी. आर. देवधर मास्तर अशा विविध घराण्यांच्या ज्येष्ठ गुरुंकडून अत्यंत कठोर अशी तालीम घेतली.

रामभाऊंना त्यांच्या उमेदीच्या काळात जसे विविधांगी पैलू पाडणारे गुरू लाभले तसेच, त्या काळातील सर्व घराण्यांचे मोठमोठे गायक-कलाकार त्यांना ऐकायला मिळाले, तर अनेकांचा जवळचा सहवास लाभला.

पं. रामकृष्णबुवा वझे ज्यांच्याकडे रामभाऊ तालमीच्यावेळी ठेका धरायला जात असत; तसेच सुरेशबाबू माने (ज्यांचे तानपुरे स्वतःचे असे रामभाऊंना असे दिले. आज देखील ती जोडी रामभाऊंच्या निवासस्थानी आहे.) सवाई गंधर्व, बालगंधर्व, मा. दीनानाथ, उस्ताद फैय्याजखाँ, बडे गुलाम अली खाँ, मोगुबाई कुर्डीकर, उस्ताद रहिमत खाँ, सूरश्री केसरबाई केरकर, पं. मल्लिकार्जुन मन्सूर, पं. विनायक बुवा पटवर्धन, पं. गजाननबुवा जोशी, उस्ताद रयाहिस हुसेन खाँ, लताफत हुसेन खा अशा अनेक बुजुर्ग गायकांचा प्रचंड प्रभाव त्यांच्या गायकीच्या घडणीत मोठा असल्याचे ते सांगत असत. अनेक गायक कलाकारांच्या त्यांच्या लकबीसह हुबेहुब गायकी ते सादर करत असत!



**रामभाऊंच्या संगीत नाटकातील एक दृश्य**

रामभाऊंचा जन्म 'पुण्याचा'...! नंतर ते दादर आणि शेवटी ते ठाण्याला स्वतःच्या 'नादब्रह्म' वास्तूमधे स्थायिक झाले. मात्र रामभाऊंना गंमतीने विचारले म्हणजे तुम्ही पुण्याचे की ठण्याचे? तर ते म्हणत स्वर विचाराल तर मी 'गाण्याचाच' गाण्यासाठी, संगीतासाठीच त्यांनी आपले अखंड आयुष्य वेचून शेवटपर्यंत विद्यार्थी दशेत राहिले.

पं. उल्हास कशाळकर, विश्वनाथ बागूल, प्रदीप नारेकर, राम प्रथम, सुधीर दातार, मधुवंती दांडेकर, सुरेश डेगवेकर, गंधर्वचे सध्याचे रजिस्ट्रार श्री. मधुसुदनजी आपटे, डॉ. राम नेने, शरदजी जोशी, अनघा गोखले, शशिकांत ओक, योगिनी जोगवेकर, राजेंद्र मणेरीकर, संजय मराठे, मुकुंद मराठे हे त्यांचे सुपुत्र अशा शेकडो विद्यार्थ्यांना त्यांनी विद्यादानाचे, विशेष म्हणजे विनामूल्य गायन शिकवले. तसेच अनेक युवा गायकांना वेळोवेळी मार्गदर्शन केले. ते शिवताना कधीच हात आखडता ठेवत नसत आणि स्वतः ठेका धरून शिकवत असत! रामभाऊंचा बंदिशींचा संग्रह फार मोठा होता. स्मरणशक्ती अत्यंत तल्लख असल्याने शेकडो रागांतील असंख्य बंदिशी त्यांना मुखोद्‌गत होत्या.

रामभाऊंच्या गायनातील मुख्य बलस्थाने होती ती म्हणजे जोडराग, अनवट रागांवर प्रचंड प्रभुत्व, स्वतः उत्कृष्ट तबला वादक असल्याने ताल, लय, लयकारीवर हुकूमत आणि कोणत्याही प्रकारच्या सपाट, घसीट, आरोही अवरोही, पेचबद्ध ताना, पं. रामभाऊ अतिशय कसदार, वेगवान, चपळ तरीही दाणेदार अशी तानक्रिया! अर्थात रामभाऊंनी तान ही फक्त गळा फिरविणारी भिंगरी नव्हती. तर कोणत्याही तालामध्ये, कोणत्याही मात्रेपासून सुरू होऊन ते अशा चपखलपणे समेवर येत की रसिकच काय, पण बडे बडे गायकही त्यांच्या अंदाजाला नतमस्तक होत असत! त्यांच्या लयीबरोबर ठेका पकडताना लयकारी बरोबर वाजवताना मोठमोठ्या तबलावादकांना घाम फुटत असे. हे मत आहे खुद्द तालयोगी पं. सुरेश तळवलकर यांचे! तालाच्या अंगाबरोबर जाणारी त्यांची गायकी रूपक तालामधे तर जास्तच खुलत असे.



रामभाऊंच्या संगीत नाटकातील एक दृश्य

तानक्रियेबरोबरच आक्रमक रामभाऊंचा आलापींमधीस आवाज हा कारुण्यांनी भरलेला, भावप्रधान होत असे. बंदिशीचा अस्ताई-अंतरा अप्रतिम सादर करून पाहिल्यास सभेला रसिकांची वाहवा ठरलेलीच असे. राग सुरु करताच एक-दोन आलापांमधेच रागाचे स्वरूप स्पष्ट करत असत! त्यांच्या स्वभावातील मृदुलता, हळवेपणा. त्यांच्या स्वरलगानामधे सुस्पष्टपणे प्रतित होत असे. करुणस्मपूर्ण तरीही कसदार अशा स्वरनिर्मितीसाठी त्यांनी आवाज चोरावा वा खोटा लावावा लागत तसे, हे वैशिष्ट्यपूर्णच!

कित्येकदा रामभाऊंनी संपूर्ण मैफल ही लयकारी शिवाय अगदी किराणा गायकीच्या शैलीमध्ये संपूर्णपणे आलापीप्रधान अशी रंगविली आहे. ब्राह्मण सभा-मुंबई, नपु हॉल-माटुंगा, भारत गायन समाज-पुणे, अमर हिंद मंडळ तसेच दुर्गा पूजा-पटणा येथे सातत्याने ३० वर्षे ते जात होते.

२३ ऑक्टो. १९२४, पुणे येथे त्यांचा जन्म! बालपणी तबल्याचे शिक्षण घेत असतानाच गोपाळ गायन समाजात संगीताचे संस्कारही झाले. एकपाठी रामभाऊंच्या अनेक बंदिशी दुसऱ्याचे ऐकूनच पाठ व्हायच्या! १९३४ ते १९४० रामभाऊंनी प्रभात चित्रपट कंपनी, मेहबूब फिल्म, सागर मुव्हीटोन इ. ठिकाणी वतन जागिरदार, मनमोहन, माणूस, गोपाळ कुब्धे संत तुलसीदास तसेच पुढे अनंत फंदी अशा १६ चित्रपटांमधून प्रमुख भूमिका केल्या. संत तुकाराम फेम विष्णुपंत पागनीस हे रामभाऊंना बाल आवाज फुटल्यानंतर १९४० मधे मुंबईला पं. वामनराव सडोलीकर यांच्याकडे घेऊन आले. पहाटे ४ ते सकाळी ९ वाजेपर्यंत ४-५ तास मंद साधना, खर्ज रियाजाने, दोन वर्षामध्ये आवाजाला गोलाई आली. आवाजामधे तेजस्विता घुमारा

आला. ही प्रक्रिया अत्यंत खडतर होती. ती गुरु आणि शिष्य दोहोंनीही निष्ठेने केली. रामभाऊ ह्या वामनरावांच्या महत्त्वपूर्ण तालमीचे ऋण नेहमी सांगत असत आणि विद्यार्थ्यांकडून तसा रियाज करवून घेत.

मास्टर मनहर बर्वे ह्यांच्याकडे अनेक राग–तालांचे विविध प्रकार गळयावर संस्कारित होऊ लागले आणि त्यातूनच गोड गळ्याचा, सुस्वरुप, देखणा, उमदा गायक 'राम मराठे' जनमानसात लोकप्रिय होऊ लागला. महाराष्ट्राबरोबरच महाराष्ट्रा बाहेरीलही आमंत्रणे येऊ लागली.

१९५० मधे नटवर्य गणपतराव बोडसांच्या आग्रहास्तव संगीत सौभद्र मधील कृष्णाच्या भूमिकेद्वारे रंगभूमीवर त्यांनी पदार्पण केले. नटसम्राट बालगंधर्व, हिराबाई बडोदेकर, विनायकबुवा पटवर्धन, नानासाहेब फाटक अशा दिग्गजांबरोबर अनेक जुन्या संगीत नाटकांतून भूमिक केल्या. १९६० ते ७५ हा संगीत रंगभूमीचा साठोत्तर सुवर्णकाळ! सुवर्णतुला, मंदारमाला, जय जय गौरी शंकर, मेघमल्हार, रंगला रंगला श्रीरंग, बैजू, तानसेन अशा जुन्या नव्या २२ संगीत नाटकांतून भूमिका करत ५००० हून अधिक नाट्यप्रयोग त्यांनी केले. मंदारमालासह ६ संगीत नाटकांचे संगीत दिग्दर्शनही त्यांनी केले. ज्यामध्ये त्यांनी अहिर भैरव बैरागी, जोराकंस, कानड्याचे प्रकार, बलोश्री कंस, बसंतबहार इ. अनेक राग त्यांनी वापरले. संगीतभूषण, संगीत चूडामणी, बालगंधर्व सुवर्णपदक, संगीत नाटक अकादमीचा राष्ट्रपती पुरस्कार इत्यादी शेकडो मानसन्मान मिळाले. परंतु अत्यंत निगर्वी, विनम्र असे रामभाऊ म्हणत असत, सरकार मान्य होण्यापेक्षा रसिकप्रिय 'लोकमान्य' होणे महत्त्वाचं!

असा हा महान कलाकार ४ ऑक्टोबर, १९८९ ललितापंचमीच्या दिवशी अनंतात विलीन झाला. आपले गुरू मास्तर कृष्णराव आणि आक्रमक गायकीचा त्यांचा आदर्श रामभाऊंनी रंगभूमीवर ठेवला. ते व संगीत सूर्य केशवराव भोसले ह्या दोघांचाही हाच पुण्यस्मरण दिन! हा निव्वळ योगायोग नाही, तर अपरंपार गुरुनिष्ठा आणि गुरुभक्ती !

**श्री. सुनील परांजपे**
४०३, न्यू चंद्रलोक सो.,
वीर सावरकर मार्ग, टेंभीनाका,
ठाणे (प.) – ४०० ६०१.

●●●

## मधुमेह प्रतिबंधासंबंधातील एक लेख

बायोमॉलिक्यूल्स, ''करंट अपडेट ऑन अँटीडायबेटिक बायोमॉलिक्यूल्स फ्रॉम ट्रॅडिशनल इंडियन मेडिसिनल प्लान्टस'' या आढावात्मक निबंधात आएशा नूर, विनय बन्सल व एम. ए. विजयालक्ष्मी यांनी सदर विषयाचा अतिशय तपशिलात परामर्श घेतला आहे. अँटी डायबेटिक, डायबेट्स, हायपर गराससेमिया, मेडिसिनल प्लान्टस या यांतील शोध संज्ञा आहेत. यांतील ७ वनस्पतींचे फोटो, कोणत्या भागाचा उपयोग होतो, मात्रा इ. माहिती देणारा तक्ता उपयुक्त आहे. यासाठी पत्रव्यवहार करावयाचा झाल्यास गणपत्र – ayeshanoor@yahoo.co.in १७ या पत्त्यावर संपर्क साधावा. मधुमेहाच्या अभ्यासासंदर्भात उपयोगी असणारा हा लेख या विषयाचा आढावा कसा घ्यावा, त्याचे उदाहरण आहे.

**संदर्भ** : करंट सायन्स २५ मार्च २०१३
**खंड** १०४/६ पृ. ७२१ ते ७२६


समंजस संशयीपणा हा चांगल्या टीकाकाराचा एक मुख्य गुण मानला पाहिजे.

# समाजावर मनापासून प्रेम करणारे कविवर्य पी. सावळाराम

*कविवर्य लोककवी पी. सावळारामांचे हे जन्मशताब्दी वर्ष. त्यानिमित्ताने दिशाचे कार्यकारी संपादक मोहन पाठक यांनी पूर्वी घेतलेली मुलाखत येथे देत आहोत – संपादक*

सावळारामांच्या प्रतिभेला पडलेली भावस्वप्ने जगप्रसिद्ध गायकांच्या गळ्यातून साकारली आणि मराठी माणसाच्या घराघरात अवतरली. पी. सावळारामांचे भावगीत किंवा भक्तिगीत लागले नाही, असा रेडिओच्या आयुष्यातला दिवस सापडणे दुरापास्तच!

निवृत्तिनाथ रावजी पाटील हे सावळारामांचे मूळ नाव. ४ जुलै, १९१४ चा जन्म. मॅट्रिक मध्ये असताना 'काळा गुलाब' ही कविता सावळारामांनी लिहिली आणि पुढे त्यांच्या प्रतिभेचा बहर फुलत गेला. राजाराम महाविद्यालयात असताना माधव ज्यूलियनांसारख्या थोर कवीचे मार्गदर्शन त्यांना लाभले. सावळाराम आपल्या टोपण नावाविषयी सुप्रसिद्ध गीत ''जा मुली जा...'' विषयी पहिल्या कवितेविषयी बोलताना विलक्षण रंगून जातात. त्यांच्या शब्दात या सर्व आठवणी ऐकण्याचा योग येणे म्हणजे एखाद्या कवितेशी एकरुप होण्यासारखेच आहे.



कविवर्य पी. सावळाराम

''तुमचेच तुम्हांला सर्वात आवडलेलं भावगीत कोणते'' या माझ्या प्रश्न विचारण्याला तसा जोर नव्हता. लगेच दादांनी सांगितले, ''आईची माया सर्व लेकरांवर असते तसेच हे आहे. तरी पण सांगायचं तर, राजकन्येची राणी झालेलं माझं एकच गीत 'गंगा यमुना डोळ्यात उभ्या का...'' हे. ते गीत लोकांनीही डोक्यावर घेतले.''

''दादा, तुम्ही चित्रपट गीतेही अनेक लिहिली आणि सर्वसाधारण अनुभव चित्रपट गीते लोकप्रिय होतात असा असतो. तुमचे वरील भावगीत मात्र त्याहूनही लोकप्रियही ठरले. याचे कारण काय?''

'' नाही म्हटले तरी चित्रपट गीत प्रसंगानुरूप लिहिताना स्वातंत्र्याचा संकोच होतोच. पण भावगीत, भक्तिगीत लिहिताना पूर्ण स्वातंत्र्य असते आणि त्यामुळेच या गीतांचा जन्म झाला, तोही हृदय हेलावणाऱ्या हृदयातून. मुलीला जड अंतःकरणाने निरोप देणारी आई. पाणावलेल्या डोळ्यांनी आईकडे पहाणारी नवविवाहिता हे दृश्य पुणे स्टेशनात पाहिले. मनात खोलवर हे दृश्य भिडले. पहिल्या दोन ओळींचा जन्म झाला. पुढे काही दिवसांनी पहाटे जात्यावरील गींतांच्यावेळी पुढचे गीत मनातून साकारले.''

दादांच्या, आशा भोसलेनी गायलेल्या 'बाई गेला मोहन कोणीकडे', 'राधा कृष्णावरी भाळली', 'धागा धागा अखंड विणूया, या आणि लताबाईंनी गायलेल्या 'घट डोईवर घट कमरेवर', 'जो आवडतो सर्वांना' या व इतर असंख्य गीतांच्या आठवणींनी आमच्या पिढीचे बालपण

जो चमत्कारांची अपेक्षा करीत असतो त्याला (होतकरू!) टीकाकार म्हणतात.

व्यापलेले आहे. या गीतातील मुक्त सौंदर्य अजूनही वेड लावू शकते. याचे रहस्य कवीने पाहिलेले नादवाही, अर्थवाही भवगर्भ वा आशयानुरूप शब्दांचे पहाटस्वप्न, आजकालची हिंदी चित्रपटसृष्टीचा परिणाम असणारी मराठी गीते असा पिढीवरील परिणाम साधू शकणे केवळ अशक्य आहे. अशी वेडीवाकडी गाणी लिहायला सावळारामांचा कसून विरोध असतो.

वसंत प्रभूंच्या संगीत दिग्दर्शनात नलिनी मुळगावकरांनी १९४९ साली गायिलेले ''नसता माझ्या मनात काही'' हे सावळारामांचे एच.एम.व्ही. वर गालेले पहिले गीत. विठ्ठल तो आला आला व ज्ञानदेव बाळ माझा ही गीते शाळांमध्ये प्रार्थना गीते म्हणून म्हटली जातात. सावळारामांनी लावण्याही लिहिल्या पण त्यांनी सांगितले ''लावण्या हा माझा खरा पिंड नव्हेच. चित्रपटाच्या गरजेनुसार त्या लिहिल्या.'' दादांची गीते नलिनी मुळगावकर, आशा भोसले, सी. रामचंद्र, जयवंत कुलकणी, लता मंगेशकर, दशरथ पुजारी, सुधीर फडके, माणिक वर्मा, सुनिति तेलंग, मधुबाला चावला, अशा विख्यात गायक-गायिका व वसंत देसाई, वसंत प्रभू, डावजेकर, मोरे, राम कदम आदी संगीतकरांनी अजरामर करून ठेवली आहेत. त्यांनी पुढील चित्रपटांची गीतेही लिहीली आहेत :

कन्यादान, सलामी, राम राम पाहुणे, तारका, आई कुणा म्हणू मी, मोलकरीण, या मालक, शिकलेली बायको, मायबहिणी, बाळ माझं नवसाचं, पावनखिंड, कधी करिशी लग्न माझे, माणसाला पंख असतात, ग्यानबा तुकाराम, छत्रपती शिवाजी, वादळ, पुत्र व्हावा ऐसा व इतर.

कै. श्री. के. क्षीरसागरांसारख्या परखड टीकाकारानेही सावळारामांच्या गीतांचे महत्त्व एका भाषणात मान्य केले. ते म्हणाले, ''गंगायमुना व विठ्ठल रखुमाई या दोन गीतांनी लोकांच्या मनाची अशी काही पकड घेतली की, त्यामुळे सावळाराम अमर झाले आहेत.''

एका विवाहित संसारी स्त्रीने आपल्या भावना पुढील शब्दात व्यक्त केल्या होत्या. गंगायमुना या गीतने स्त्रीच्या मनातील भावना यथार्थ शब्दात व्यक्त केल्या होत्या तर ''बाळा होऊ कशी उतराई...'' या गीताने त्यावर कळस चढविला. सर्व सामान्यांच्या हृदयाचे सिंहासन जिंकण्यास कारणीभूत झालेल्या गायक, गायिका, संगीतकारांचे ऋण दादा नेहमीच व्यक्त करतात. जो कवी समाजावर मनापासून प्रेम करतो, तोच कवी अंतःकरणाला जाऊन भिडेल असे काव्य लिहू शकतो ही दादांची धारणा अबाधित होती.

•• •• ••

आमच्या विद्या प्रसारक मंडळाचे ते सदस्य व उपाध्यक्ष होते. हे त्यांचे जन्म शताब्दी वर्ष असल्याने मी पूर्वी घेतलेल्या त्यांच्या मुलाखतीतील काही भाग कृतज्ञता म्हणून येथे देत आहे. दादांबरोबरच्या सहवासातील ती सकाळ अत्तरगंधित होती. त्यांच्या अनेक आठवणी आजही मनात साठून आहेत.

**श्री. मोहन पाठक**
ठाणे

●●●

''मी सौंदर्यपूजक असल्यामुळेच मी राजकारणाकडे वळलो हे लोकांनी ध्यानात घ्यायला हवं. सौंदर्यपूजकाची अनुभूती जेव्हा अतिशय तीव्र होते तेव्हा त्याच्या ध्यानी येते की कागद-कलमातून अभिव्यक्त होऊन त्या अनुभूतीचं समाधान होत नाही. उलट अभिव्यक्तीसाठी जीवनाचेच माध्यम करावे लागते. कारण, सभोवारची असुंदरता त्याला असह्य होते. तिच्या निवारणाच्या प्रयत्नाला लागले म्हणजे ती उत्कट अनुभूती समाधान पावते. मी सौंदर्यपूजक असल्यामुळेच मी राजकीय रणकंदनात उतरलो आहे.''

ना. ग. गोरे
**- संग्रहातून**

टीकाकाराचे घड्याळ इतरांच्या घड्याळांपेक्षा पुढे असते.

# साहित्य-जगत

*ग्रंथप्रसारक श्री. शरद जोशी यांच्या ग्रंथप्रेमातून लिहिलेले हे लेख संबंधित अभ्यासकांच्या दृष्टीने उपयुक्त आहेत*
*– संपादक*

**शलोम इस्त्रायल (ले. डॉ. अभिजित वैद्य)**

देशमुख आणि कं. पब्लिशर्स प्रा.लि. (डॉ. रामचंद्र दत्तात्रय तुळपुळे ४७३, सदाशिव पेठ, पुणे–४११०३०) यांनी १९९९ साली प्रसिद्ध केलेले हे एक सुंदर पुस्तक (पृ. २०४, कि. २५०/–).

पहिल्याच प्रकरणांत लेखक म्हणतो, 'इस्त्रायल या राष्ट्राची निर्मिती हा ह्या शतकातील (२०व्या) चमत्कार म्हणावा लागेल. दोन हजार वर्षांपूर्वी आपल्या मायभूमीतून परागंदा व्हावे लागलेले 'ज्यू' धर्मीय लोक जगभर विखुरले गेले. युरोपीय राष्ट्र, अमेरिका, रशिया, भारत, चीन या सर्वच देशांमध्ये हे ज्यू आपले वेगळे अस्तित्व टिकवून धरीत आपल्या संस्कृतीचे जतन करीत राहिले!

'हिटलरच्या ज्यू द्वेषामुळे व त्याने केलेल्या वंशच्छेदाच्या प्रयत्नांमुळे आपली हक्काची भूमी असण्याची गरज ज्यू धर्मीय लोकांना अतिशय तीव्रतेने जाणवली. त्यांतूनच 'पॅलेस्टाइन' या नावाने ओळखल्या जाणाऱ्या इस्त्रायलचा जन्म झाला. हा जन्म रक्तरंजित तर होताच. त्यामुळे काही जुन्या भळभळा वाहणाऱ्या जखमा बऱ्या झाल्या असल्या तरी काही नवे, खोलवर जाणारे घावही घातले गेले. त्यांतून निर्माण झालेल्या नव्या जखमा पुढील काही दशके तरी वाहातच राहतील आणि या राष्ट्राचा जन्मच रक्तलांच्छित न राहता त्याचे आयुष्यही रक्ताने माखलेलेच राहील असे चित्र आज तरी आपल्याला दिसते आहे.'

डॉ. अभिजित वैद्य हे भारताचे एक सुजाण सुसंस्कृत नागरिक आहेत. आपल्या मायभूमीवर त्यांचे प्रेम आहे. भारतात जन्म झाल्याचा त्यांना अभिमान आहे. इस्त्रायलची आर्थिक सुबत्ता आणि तंत्रज्ञानातील उत्तुंग भरारी पाहून त्यांना भारतातील सद्यस्थितीबद्दल वाटत असलेली खंत वेळोवेळी उफाळून येते. (गेल्या १३ वर्षात तर ही परिस्थिती आणखीनच भयानक झालेली आहे. या अवधीत इस्त्रायलाविषयी काही पुस्तकेही प्रसिद्ध झालेली आहेत. लेखक व प्रकाशन यांच्या कडून ती माहिती मिळविण्याचा प्रयत्न केला पण अद्यापपर्यंत ती माहिती मिळालेली नाही.–ले.) ही खंत या पुस्तकात जागोजागी व्यक्त केलेली आहे. ही खंत प्रामाणिकपणे व्यक्त करीत असताना ही परिस्थिती बदलावी ही त्यांच्या मनीची तळमळ त्यांच्या लेखनातून आपल्याला सतत जाणवत राहते. प्रवास वर्णनाच्या मर्यादा सांभाळून डॉ. वैद्य यांनी केलेली ही भाष्ये या पुस्तकाचे खरे बलस्थान आहे आणि त्यामुळेच हे पुस्तक प्रवास वर्णनाच्या पारंपरिक ढाच्या पासून वेगळे झालेले आहे आणि म्हणूनच, प्रत्येकाने ते वाचावे असा माझा आग्रह आहे.

भारताच्या बरोबरीनेच इस्त्रायला स्वातंत्र्य मिळाले. तरी या राष्ट्राने गेल्या ५० वर्षात आर्थिक आणि तंत्रज्ञानाच्या क्षेत्रात नेत्रदीपक अशी प्रगती केलेली आहे. इस्त्रायल राष्ट्र साऱ्या अरब राष्ट्रांनी वेढलेले आहे. ही सारी राष्ट्र इस्त्रायलला आपल प्रथम क्रमांकाचा शत्रू मानत असल्यामुळे आपले अस्तित्व टिकवून धरण्यासाठी गेल्या पन्नास वर्षात इस्त्रायला अनेक युद्धे खेळावी लागली. या युद्धांमध्ये झालेली जीवित आणि वित्तहानी स्वीकारून आजही हे राष्ट्र सदैव युद्ध सज्ज राहून ताठ मानेने उभे आहे.

---

जो टीकेचे हत्यार गुलाबांनी अलंकृत करतो, तो खरा टीकाकार.

### डॉ. वैद्य यांचे निरीक्षण

अशा या जगावेगळा इतिहास असणाऱ्या राष्ट्रात तीन महिने राहण्याची संधी त्यांना मिळाली. इस्त्रायल सरकारनेच दिलेली शिष्यवृत्ती वैद्यकीय अभ्यासासाठी होती. हा अभ्यासक्रम पूर्ण करीत असतानाच डॉ. वैद्य अनेक व्यक्तींना भेटले. महत्त्वाच्या स्थळांना त्यांनी भेटी दिल्या. नव्या इस्त्रायलमधील समाज जीवन त्यांनी अत्यंत डोळसपणे न्याहाळले. भारतातून इस्त्रायलमध्ये स्थायिक झालेल्या मराठी भाषिक मंडळांशी त्यांचे संबंध जुळले. (डॉ. वैद्य हे मूलतः समाजवादी विचारसरणीचे आहेत. हिंदू धर्मातील काही जुन्या परंपरा, अंधश्रद्धा या टाकाऊ गोष्टी असून त्या फेकून दिल्याशिवाय आपल्या राष्ट्राला तरणोपाय नाही अशी त्यांची धारणा आहे. मूलतत्त्ववादी आणि हिंसक मार्गाचा अवलंब करणाऱ्या व्यक्तींविषयी त्यांच्या मनात तीव्र संताप आहे. हा खंडप्राय आणि अंतर्गत विरोधाभासांनी भरलेला, दारिद्र्यात खितपत पडलेला देश, एक संपन्न, बलवान आणि सामाजिक न्यायाची जपणूक करणारे राष्ट्र म्हणून उभा रहावा हे त्यांचे स्वप्न आहे.) डॉ. वैद्य यांच्या संवेदनाशील मनाने मनुष्य स्वभावातील भाव-भावनांची ही आंदोलने वेधकपणे टिपली आहेत आणि तेथील प्रसिद्ध ठिकाणांची माहिती मनोरंजक स्वरूपात सादर केली आहेत. ती मूळातूनच वाचणे अत्यंत आवश्यक आहे.

'**शलोम**' हा हिब्रू भाषेतील शब्द आहे. त्याचा अर्थ 'शांती' असा आहे. आपल्या तेथील तीन महिन्यांच्या वास्तव्यात त्यांना भेटलेली असंख्य 'भारतीय ज्यू' माणसं नुसतंच भारतावर नाही तर आपल्या मराठी मातीवर आजही तेवढच अलोट प्रेम करणारी, इथल्या आठवणींनी मोहोरणारी, गहिवरणारी दिसली. आपल्या मनोगतात ते पुढे म्हणतात की याचबरोबर जाणवून गेलेली नव्यान उभ्या राहिलेल्या आणि संपन्नतेकडे वाटचाल करणाऱ्या या राष्ट्राच्या घडणीच्या गर्भात दडलेल एक वास्तव धर्म आणि वर्ण, धर्म आणि संस्कृती यांच्या संघर्षाचं! हे वास्तव मला तिथे भेटलेल्या विविध माणसांशी झालेल्या संवादातून उलगडत गेलं. तसं वास्तवाचं आपल्या देशाच्या घडणीशी कुठेतरी नातं आहे असं वाटत राहिलं. त्यासाठी धडपडणाऱ्या सर्वांपुढे हे आव्हान आवश्यक वाटू लागले. या पुस्तकाच्या लेखनामागे माझ्या मनातली हीच मुख्य भावना आहे. हे नुसतं इस्त्रायलमध्ये घेतलेल्या वैद्यकीय अनुभवाचं आणि पाहिलेल्या विविध प्रेक्षणीय स्थळांच वर्णन नसून त्यामागील वैचारिक प्रवासाचं वर्णन आहे.'

वाचक हो, या पुस्तकात जे जे लिहिलं गेलय ते ते मी या लेखात उधृत केल आहे. त्यात माझा स्वतःचं काहीही नाही. तरीही प्रत्येकने हे पुस्तक आवर्जून वाचाव असं मी वर म्हटले आहे. कारण कितीतरी मनोरंजक, वैचारिक आणि आपल्या मनाला धक्का देणाऱ्या गोष्टी या पुस्तकात सांगितलेल्या आहेत. त्या वाचताना आश्चर्याचे एकेक धक्के बसतात. महत्त्वाची माहिती मिळते. शेवटी लेखक/प्रकाशक यांचे अभिनंदन. (मात्र गेल्या १३/१४ वर्षात काय कमी अधिक परिस्थिती बदलली याच्या माहितीच्या अभावी मी आपल्याला सांगू शकत नाही. क्षमस्व. नव्या पिढीला ही महत्त्वाची माहिती कळावी एवढ्या उद्देशानेच हा परिचय दिला आहे.)

**श्री. शरद जोशी (ग्रंथ प्रसारक)**
५, अमर कल्पतरू सोसायटी,
देवी चौक, शास्त्रीनगर,
डोंबिवली - ४२१२०२
दूरध्वनी : ९५२५१२-४८६९६७

●●●


निसर्गाने कलावंत निर्माण केले तेव्हा उरलेल्या तुकड्यातून त्याने टीकाकार निर्मिले.

पुस्तक परिचय

# आठवणी जागतात-आठवणींचा मागोवा

निवृत्त झाल्यानंतर आपण आपल्या पूर्व आयुष्यात काय केले. आपली जडण घडण कशी झाली आणि भल्याबुऱ्या माणसांचा आपला कसा संबंध आला हे सांगून अंतर्मुख होऊन सर्व लिहून काढावे आणि आपल्या आयुष्याला शब्दबद्ध रुप द्यावे असा प्रयत्न अनेकजण करतात. अशी पुस्तके ही विनामूल्य आपल्या नातेवाईक व स्नेही मंडळीत त्यांना प्रेमभराने देतात.

अशी पुस्तके हा आपल्याकडील सामाजिक व शैक्षणिक इतिहासाचा एक चांगला स्त्रोत असतो. त्यामुळे अभ्यासकांच्या दृष्टीने स्मरणिका, अशी आत्मवृत्तपर पुस्तके, वृत्तांत, पत्रे यांची ग्रंथालयांनी निगा राखली पाहिजे.




ठाण्याचे हार्मोनियम (संवादिनी) वादक राजाभाऊ पेठे हे संगीताच्या प्रांतात गेली साठपेक्षा अधिक वर्षे साधना करतात. किंबहुना ठाण्याच्या संगीत विश्वात राजाभाऊ पेठे हे नाव माहीत नाही असा रसिक कोणीही नसेल. राजाभाऊंचे मूळ नाव मोरेश्वर सदाशिव पेठे हे आहे. पंच्याहत्तरीच्या निमित्ताने मागे वळून पहाताना त्यांनी हे जे आत्मवृत्तात्मक लेखन केले ते 'आठवणी जागतात' या पुस्तकात शब्दबद्ध केले आहे. आपल्या जन्मापासूनच्या वाटचालीत बालपणापासूनच्या आठवणींचा हा अतिशय चांगला असा मागोवा आहे. नोकरीच्या दिवसांमध्ये आलेले चढउतार, वासुदेव फडक्यांवरील चार लेख आणि महत्त्वाचे म्हणजे श्री गजानन महाराजांचा त्यांना आलेला अनुभव या लेखांमधून खूप संदर्भ मिळतात. आपल्या कुटुंबातील लोकावंर जसे त्यांनी लेख लिहिले आहेत तसेच ठाण्यातील पंडित भाई गायतोंडे, दादा तेलवणे अशा कलावंतांवरील लेख ही त्यांनी लिहिलेले आहेत. प्रपंच आणि परमार्थ, बिस्मिला खाँ साहेब, म्हातारपण असे एकूण ४९ लेख या पुस्तकात समाविष्ट आहेत. १८८२ साली मी त्यांची घेतलेली मुलाखत ही देखील त्यांनी आवर्जून पुस्तकात पुनः मुद्रित केलेली आहे. बालपण व विद्यार्थिदशा या पहिल्याच लेखामध्ये त्यांनी म्हटल्याप्रमाणे असे पुस्तक लिहिताना पडणारा प्रश्न यातही आहे. तो म्हणजे, 'लिहिण्याचे ठरवल्यानंतर सुरुवात कुठून करावी?' मोठ्या मान्यवर लोकांनी आठवणी लिहिल्या तर त्याला 'आत्मचरित्र' म्हणतात. इथे तसा प्रकारच नाही असे नम्रपणाने ते लिहितात. राजाभाऊ पेठे हे मूळचे गुहागरचे; पण त्यांच्या सात आठ पिढ्या अक्षी या गावात गेल्या. त्यामुळे कोकणच्या जीवनातील बरेच संदर्भ यामध्ये येतात. आई वडिलांचे आणि घरातील इतर कुटुंबियांचे उल्लेख येतात. तसेच त्यांच्या शैक्षणिक वाटचालीतील तपशीलही बरेच येतात. म्हातारपणामध्ये अनेक अडचणी येतात. विस्मरणासारखी मधुमेहासारखी दुखणी किंवा स्वभावातील वाढता भांडखोरपणा, हट्टीपणा यांनी माणूस त्रस्त होतो. आपल्या पृ.१११ वरील 'एक पण, जिंकता न येण्याजोगा –म्हातारपण' यात म्हातारपणावर मात कशी करता येईल याचे काही उपाय व अनुभव त्यांनी दिले आहेत.

या लेखामध्ये कालसंगती हा मुद्दा महत्त्वाचा नसून जशा आठवतील तशा आठवणींचे संकलन महत्त्वाचे असते. या सर्व दृष्टींनी राजाभाऊंनी लिहिलेले हे पुस्तक वाचनीय तर झालेले आहेतच; पण कोकणातील अलिबाग परिसराची व ठाणे मुंबईतील जीवनाची उपयुक्त माहिती यात आहे.

पंचाहत्तरीच्या निमित्ताने राजाभाऊंचे मनःपूर्वक अभिनंदन!

**आठवणी जागतात** – राजाभाऊ पेठे, ठाणे
(खाजगी वितरणासाठी) पृ. १४३

**मोहन पाठक**

●●●

अति जिज्ञासा दाखवली की, सुख पळालेच म्हणून समजा.

# आयुर्वेद

*आयुर्वेदाची प्राथमिक ओळख करून देणारा हा लेख – संपादक*

आयुषः वेदः आयुर्वेदः।

आयुर्वेद म्हणजे दीर्घायुष्यासंबंधी विचार करणारा वेद होय. आयुर्वेद हा संस्कृत भाषेतील शब्द असून त्याचा संधिविग्रह (आयुः) जीवन+विद्या (वेद) अशाप्रकारे होतो. आयुर्वेद आणि त्यासारख्या विद्याशाखांमधून भारतात प्राचीन काळापासून असलेल्या वैद्यकीय ज्ञानाची कल्पना येते. आयुर्वेदाला सुमारे ३००० वर्षांपासून चालत आलेली व्यापक आणि उत्तुंग परंपरा आहे. आयुर्वेदातील उपचार पद्धतींमध्ये वनौषधी, वनस्पतिजन्य औषधी आहारविषयक नियम, व्यायामाचे विविध प्रकार आणि त्याद्वारे शरीरातील नैसर्गिक प्रतिकार शक्ती वाढविण्यावर भर दिला जातो.

जो आयुष्याचे ज्ञान करवितो तो आयुर्वेद होय. तसेच तो आयुष्याला हितप्रद व हानिकारक अशी द्रव्य गुण कर्मे समजावून सांगतो तो आयुर्वेद होय.

काया, शल्य, शालाक्य, बाल, गृह, विष रसायन व वाजीकरण अशी आयुर्वेदाची आठ अंगे आहेत. आयुर्वेदाच्या सर्व संहिता आणि संग्रह ग्रंथ यांत ब्रह्माला आयुर्वेदाचा आदि प्रवक्ता म्हटले आहे.

''स्वयंभूर्ब्रह्मा प्रजाः सिसृक्षुः प्रजाना
परिपालनार्थमायुर्वेदमेवाग्रेड ऽ सृजत्....।।''

प्रजा उत्पन्न करण्याची इच्छा करणाऱ्या स्वयंभू ब्रह्माने प्रजेच्या पालनासाठी प्रथम आयुर्वेदच निर्माण केले आहे.

आयुर्वेदातील काही वनस्पती औषधांचे संदर्भ हे मुख्य चार वेदांपैकी एक असलेल्या अथर्ववेद या इसवी सनपूर्व सुमारे १२०० मध्ये रचल्या गेलेल्या वेदांमधून घेतले आहेत. म्हणून, याला अथर्ववेदाचा उपवेद मानतात.

समुद्रमंथनातून निघालेले भगवान 'धन्वंतरी' हे आयुर्वेदातील परंपरेनुसार आद्य वैद्य मानले जातात.

वैदिक काळापासून आयुर्वेद शाळा असल्याचा इतिहासाचा पुरावा आहे. भगवान आत्रेय व धन्वन्तरी हे त्या काळाचे आयुर्वेदाचे महत्त्वाचे व महान असे गुरू होत. चिकित्सा शाळांचे शिस्तबद्ध शिक्षण देणारे हे पहिले शिक्षक होत. आयुर्वेद हा अथर्ववेदाचा उपवेद आहे. रोग निवारण्यासाठी मंत्र व वनस्पती यांचा उपयोग पूर्वी केला जात असे.

चरक, सुश्रुत, वाग्भट, धन्वंन्तरी इ. शास्त्रज्ञांचे ग्रंथ वैद्यकशास्त्रांत महत्त्वाचे मानले जात असे. परंतु काळाच्या ओघामध्ये अनेक भारतीय शास्त्रे आणि कला यांचा लोप झाला आणि अशातच, भारतीय वैद्यकशास्त्र म्हणजेच आयुर्वेद निर्माण झाला.

शरीर, गर्भविद्या आणि निदानासह चिकित्सा ह्या तीन शास्त्रांचा वेदकाली प्रारंभ झाला होता. याची गमके वैदिक वाङ्मयात सापडतात. शतपथ ब्रह्मण व अथर्ववेद यात मानवी शरीराची हाडे व अवयव पद्धतशीर रीतीने मोजून सांगितले आहे. शतपथ ब्राह्मणात माणसाच्या शरीरात ३६० अस्थी असतात असे सांगितले आहे.

वेदकालीन वैद्यक हे शास्त्र अस्तित्त्वात आल्यामुळे स्वाभाविकपणे त्याला आयुर्वेद अशी संज्ञा प्राप्त झाली.

जिज्ञासा ही आशेची बहीणच असते.

प्राचीन सांख्यदर्शन या दर्शनशास्त्रावर आयुर्वेद आधारलेले आहे. त्यात सर्व भौतिक जग हे पाच मूल तत्त्वांपासून तयार झाले असे मानले जाते. यातील प्रत्येक 'मूळ' तत्त्वात स्वतःचे काही गुण आहेत ही मूळ तत्त्वे खालीलप्रमाणे–

१. आकाश
२. वायू
३. अग्नी
४. आप
५. पृथ्वी

''तत्र शरीरं नाम चेतनाधिष्टानभूतं।
पञ्चमहाभूतविकारसमुदायात्मकम्।।''

**अर्थ** :– शरीर म्हणजे चेतनतत्त्वाला अधिष्ठान् असलेली आणि भूतांच्या अनेक विकारांनी युक्त असलेली वस्तू होय.

सर्व शारीरिक प्रक्रिया वातदोष, कफ दोष व पित्तदोष या तीन दोषांच्या संतुलनातून नियंत्रित केल्या जातात असे आयुर्वेद मानते.

आयुर्वेदाने आहारामध्ये वनस्पतीच्या आहाराप्रमाणे प्राणिज आहाराचेही शास्त्र बनवले. आयुर्वेदीय शास्त्रकारांनी आयुष्याचा किती खोलवर विचार केला आहे हे कळून येते. नाडी विज्ञान हे आयुर्वेदाचे खास वैशिष्ट्य आहे. अरब देशातील लोकांच्या शिवाय जगात कुठल्या वैद्याकशास्त्रात नाडी विज्ञान आढळत नाही. अरबांनीही ही विद्या भारतीयांपासून ग्रहण केली आहे. मनुष्याची नाडी पाहून त्याचा पूर्वेतिहास व त्याची स्थिती जाणणे हे काम भारतीय वैद्यच करू शकतात.

आयुर्वेद ही भारताला फार मोठी देणगी लाभली आहे. अश्विनीकुमार संहिता, ब्रह्मसंहिता, आग्नीध सूत्रराज या अतिप्राचीन संहितांबरोबरच आयुर्वेदातील सुश्रुतसंहिता, धन्वन्तरीसूत्र, धातुवाद, मानसूत्र, इन्दसूत्र, अष्टाङ्हृदय हे ग्रंथही सुविख्यात आहेत. आयुर्वेदाच्या सर्व संहिता व संग्रह ग्रंथ यात ब्रह्माला आयुर्वेदाचा आदिप्रवक्ता म्हटले आहे.

आयुर्वेदाचे स्वास्थानुवृत्तिकर व रोगच्छेदकर असे दोन भाग आणि हेतू, लक्षणे आणि औषधविज्ञान असे तीन स्कंद आहेत. म्हणून, त्याला 'त्रिस्कंद आयुर्वेद' असे म्हणतात.

आहारविहाराला आयुर्वेदात फार महत्त्व दिलेले आहे. आहारविहार योग्य तऱ्हेने सांभाळला तर औषधांची गरजच उरणार नाही, असे चरकसंहितेत म्हटले आहे. म्हणून आहारविहाराच्या माध्यमातून व्याधींचा प्रतिबंध केला पाहिजे असे आयुर्वेद सांगतो

आयुर्वेदाने संपूर्ण शरीराचा साकल्याने विचार केला आहे. त्याला शरीराच्या रुग्ण स्थितीचाही सर्व बाजूंनी विचार करता येतो. कोणत्याही साधनेला वा उपासनेला निरोगी शरीराचे माध्यम महत्त्वपूर्ण आहे.

''शरीरम् आद्यं खलु सर्वधर्मसाधनम्।''

त्यामुळे आयुर्वेदाच्या अभ्यासाला विशेष महत्त्व स्थान प्राप्त झाले आहे.

**संदर्भ** : १. भारतीय संस्कृती कोश
२. मराठी विश्वकोश
३. आयुर्वेद कोश

**सौ. स्वाती अजित राऊत**

●●●


*दिशा संपर्क दूरध्वनी*
०२२-२५४२ ६२७०

# गुरुवर्य स. वि. कुळकर्णी यांस आदरांजली

गुरुवर्य एस. व्हींच्या आठवणी हे त्यांच्या विद्यार्थ्यांच्या मनात कायम दरवळणारे अत्तर असते. अशाच एका मनातील आठवणींचा हा सुहास – संपादक

**अभिजात वाङ्मयाची जाण व इंग्रजी भाषा शास्त्राचे प्राण जाणणारे माझे आद्य गुरू एस. व्ही.**

आम्ही विद्यार्थी एकमेकांशी बोलताना एस. व्हींचा तास केव्हा आहे असे विचारत असू. कारण स.वि. कुळकर्णी सरांची ती लकब होती. ते आम्हा विद्यार्थ्यांना असेच संबोधत. मला ते, एच. एस. काय म्हणता, असे विचारत. आमच्या वर्गातील कुटीरोद्योग मंदिराचे मालक अगर ठाण्याच्या गादी कारखान्याचे मालक यांसही त्यांच्या अध्याक्षरांनी संबोधत. त्यामुळे आम्ही पण एस.व्हीं. चा पीरियड, एस. व्हींचा विद्यार्थी असा परिचय करून देत असू.


एस. व्ही. कुळकर्णी

मी मूळापासून म्हणजे पाचवीपासून एस. व्हीं.चा, म्हणजे एम.एच. हायस्कूलचा विद्यार्थी नाही. आम्ही लहानपणी मुलुंडला रहात असू. परंतु मुलुंडला चौथीनंतर शाळा नाही. म्हणून वडिलांनी ठाणे निवडले व स्टेशन जवळील राघोबा शंकर रोडवरील देवमास्तरांच्या वाड्यात छोटी जागा घेतली व घराजवळची शाळा म्हणून माझे नाव पाचवीला न्यू इंग्लिश येथे घातले. ती शाळा तेथील शिक्षक मला आवडले होते. परंतु नंतर नंतर ठाण्यामध्ये शैक्षणिक वातावरणात अशी हवा पसरली की, एम. एच. हायस्कूल मधील विद्यार्थी मॅट्रिकमध्ये जास्त मार्क मिळवतात व तेथे इंग्रजी व मराठी एस. व्ही. शिकवतात व गणित एन.टी. केळकर शिकवतात. तेव्हा ती शाळा हुशार विद्यार्थ्यांस जास्त चांगली. म्हणून माझे वडिलांनी माझे नाव एम.एच.हायस्कूलमध्ये घातले. माझ्याबरोबर न्यू इंग्लिश स्कूलमधील आणखी पाच-सहा हुशार विद्यार्थी एम.एच. हायस्कूलमध्ये आले.

माझे आजचे चालू वय ८६ (८६+) आहे. त्यामुळे माझ्या या आठवणी सुमारे ७० वर्षांपूर्वीच्या आहेत. परंतु अजूनही माझ्या लक्षात आहेत व मला सुखावतात. त्या मी सांगत आहे.

एस. व्हीं. चे व्यक्तिमत्त्व लोभस होते. ते दुपाखी पंख असलेले शुभ्र धोतर नेसत असत व अंगात लांब पांढरा शुभ्र सदरा असे. चालताना थोडेसे ढंगदार चालत. चेहऱ्यावर नेहमी प्रसन्न स्मित असे. वर्गात कधी बसलेले त्यांना पाहिले नाहीत. उभ्यानेच टेबलाच्या मागे उभे राहून शिकवत. दोन भाषा शिकवत. एक इंग्रजी व दुसरी मराठी. त्यांचे उच्चार स्पष्ट, शब्दाला लय व गोडवा होता.

एक आठवण- एकदा शिकवताना ते म्हणाले कवीला प्रतिभा असते व ती जन्मजात असते. Poets are born, and not made.

मी म्हटले, ''सर प्रतिभा ही औषधाने प्राप्त होते असे मी एका वैद्यकीय लेखात वाचले आहे.'' ते म्हणाले,

मला दाखव पाहू तो लख. मी त्यांना पुस्तक आणून दाखवले. त्यात असे होते की, ''आस्कंद'' चूर्ण घेतले तर प्रतिभा प्राप्त होते. एस. व्हीं.नी ते वाचले आणि म्हणाले, ''एच.एस.'' अरे ही कवि-प्रतिभा नाही. ह्या औषधाने मन शांत होते व थोडे चांगले चांगले थोडा वेळ सुचते. मला त्यावेळेस हे नीट कळले नव्हते, परंतु पुढे मराठीचा वाङमयाचा एम.ए.चा अभ्यास करताना रा. श्री. जोगांचा ''अभिनव काव्यप्रकाश'' व मम्मटाचा काव्यप्रकाश समजून घेताना कालिदासाची प्रतिभा ''कविप्रतिभा'' लक्षात येते व त्यावेळेस एस. व्ही. आठवतात- एस.व्ही. असे ताजे आहेत.

दुसरी एक आठवण - एकदा काय झाले ते आम्हांला Daffodils ही कविता शिकवत होते. ते म्हणाले काव्य समजून घेताना शब्दांचे केवळ डिक्शनरीतले अर्थ उपयोगाचे नसतात. वाक्यार्थाबरोबर लक्षार्थ व ध्वन्यार्थही महत्त्वाचे असतात. शब्दांची जुळणी करून काव्य होत नसते. असे पहा, कल्याणपासून व्ही. टी. पर्यंतच्या स्टेशनांची नावे एकत्र गुंफुन काव्य करता येईल पण ते काव्य नव्हे. माझ्या मनात आले आपण असे काव्य करावे व मला ते सुचले ते लिहून काढले (अजून आठवणीत आहे)

मला ती गाडी आवडे फार/मला ती गाडी आवडे फार ।।धृ।।
कल्याणनंतर ठाकुर्लीला त्याच्यानंतर डोंबिवलीला
नंतर ती येते ठाण्याला धावत धावत, मला ती गाडी आवडे फार ।।१।।
त्याच्यानंतर दादर येते, दादरनंतर व्हीटी येते
अशी माझी गाडी धावते। मला ती गाडी आवडे फार ।।२।।

मला खूप आवडले होते. गुणगुणत होतो. लिहून काढले आणि एस. व्ही. ना दाखवले. ते म्हणाले, 'हे काव्य नव्हे, ही शाळकरी कविता आहे.' काव्याची किंचितशी कल्पना आली. परंतु पुढे शंकर वैद्य, श्री. पु. भागवत यांचेकडून अभिजात काव्याचे दर्शन ऐकताना माझी ती 'मला ती गाडी आवडे फार' ही कविता व एस. व्ही. यांची आठवण येत असे.

आणखी एक आठवण सांगतो, ती आहे त्यांची इंग्रजी भाषा शिकवण्याची. मी मॅट्रिकला असताना ते काही विद्यार्थ्यांना घरी फी घेऊन शिकवत. मला वडिलांनी एस.व्हींच्या क्लासला घातले. एस.व्ही. खारकर आळीत पहिल्या मजल्यावर राहत. जिना चढून वर आले की, समोरच एस.व्हीं.ची बसण्याची खोली होती. ही शिकवणीची खोली स्वच्छ, उजेड असे. खिडक्या पूर्व बाजूस होत्या. खिडकीच्या खाली पलंग असे. शुभ्र चादर घातलेली. एस. व्ही. पलंगावर बसत. समोर दोन रांगांमध्ये तीन-तीन खुर्च्या असत. फक्त सहाच विद्यार्थी घेत. वेळ सकाळी ७ ते ८ अगदी नेमक्या वेळेवर क्लास सुरू होई. एस. व्ही. पलंगावर बसून शिकवत. ''रेन अँड मार्टिन'' व्याकरणाचे पुस्तकास धरून अभ्यास होई. त्यात Analysis, Clauses, Transformation of sentences असे असत. पण त्यांना आवडणारे विषय Figures of speech, अलंकार, इंग्रजीच्या Proverbs (म्हणी) यास ते जास्त वेळ देत. कधी Times of India चा अग्रलेख वाचीत व त्या अग्रलेखाची वाक्यरचना, त्यात असलेले अलंकार, म्हणी उलगडून दाखवत. ते आम्हांला सांगत की तुम्ही Times of India वाचा. शब्द संपत्ती वाढते. भाषा सुधारते. आता Times of India वाचताना एस.व्ही. आठवतात.

आणखी एक आठवण - म्हणजे कोणत्याही सभेची बैठक असली की, एस. व्ही. ठरलेल्या वेळेला, ठोक्याला हजर असत. नगरवाचन मंदिर, ठाणे ग्रंथ संग्रहालयात एस.व्ही. यायचे तर अगदी वेळेवर. इतर कार्यकर्ते उशिरा येतात, प्रत्यक्षात भारतीय वेळ असते, हे माहीत असूनही ते मात्र अगदी वेळेवर हजर रहात. अशी ही स्वयंशिस्त-मूर्ती.

आता एक दोन इतर आठवणी - त्यांतील एक

---

जुनीपुराणी चालरीत ही कालांतराने प्रबळ बनते.

म्हणजे मुख्याध्यापक एन.टी. केळकर यांचे गणित शिकवणे. भूमितीची प्रमेये व ऑलजिब्रा, इक्वेशन इतके तार्किक की पैकीच्या पैकी मार्क मिळत व मला वाटते माझ्यात तार्किक विचार करण्याची सवय अशी लागली, तर्क रुजला. असेच दुसरे सर म्हणजे संस्कृत शिकवणारे घैसास गुरुजी. सुस्पष्ट उच्चार, श्लोक म्हणतानाचे आरोह अवरोह व उत्कृष्ट पाठांतर.

असे हे कविहृदयाचे एस.व्ही. व आपल्या विषयावर प्रेम करणारे शिक्षक – तेथे कर माझे जुळती–तेथे कर माझे जुळती.

**श्री. ह. श्री. परांजपे**
(निवृत्त ग्रंथपाल )
बेडेकर कॉलेज, ठाणे

●●●

*जास्त पाणी पिण्याचे फायदे*

- त्वचा चांगली होते.
- शरीरातली विषारी द्रव्यं निघून जातात.
- हृदयविकाराचा झटका येण्याचा धोका कमी होतो.
- सांधे आणि स्नायू यांना वंगण मिळतं आणि त्यांची हालचाल सहज होते.
- ऊर्जा प्राप्त होते, आपण सतत जागरूक राहतो.
- कामात नियमितता येते.
- वेगवेगळ्या प्रकारचे आजार आणि संसर्ग होण्याची शक्यता कमी होते.
- शरीराचं तापमान नियंत्रित राहतं.
- चरबी जाळली जाते आणि स्नायू बळकट होतात.
- फिटनेस वाढतो.

**– संकलित**

●●●

## कथा विलेपार्ले स्थानकाची

एकोणीसशे सात साली विलेपार्ले रेल्वे स्थानक अस्तित्वात आले. विलेपार्ल्याच्या आजच्या तेजपाल रोडवर संपत आणि उदेशी या भाटीया कुटुंबियांच्या मालकीचे तीन बंगले होते. याच परिसरात ख्यातनाम तेजपाल कुटुंबाचा 'मोरबंगला' ही भव्य वास्तू उभी करण्याचे घाटत होते. प्रश्न होता तो बांधकाम साहित्य कसे आणावयाचे याचा. वास्तवित तेजपाल यांच्या मालकीच्या जमिनीजवळून रेल्वेमार्ग जात होता. पण रेल्वे स्थानक मात्र नव्हते. तेव्हा तेजपाल यांनी सरकारशी बोलणी करून स्थानकाशी स्वतःची जमीन देऊ केली. एवढेच नव्हे, तर दहा हजार रुपयांचा खर्चही सोसला. परिणामी स्थानक मंजूर झाले. स्थानकाच्या परिसरात विलेपार्ले नावाचे कुठलेच गावठाण नव्हते. सांताक्रूझ नजीक असलेले हडले (हरला) गावठाण यातून 'विलेपार्ले' नाव प्रचारात आले.

पण तत्पूर्वी काही काळ या स्थानकास 'विडलई–पाडलई' असे नाव होते. हे स्थानक प्रथम झाले तेंव्हा फलाट नसला तरी तेथे रेल्वे गाड्या उभ्या राहत. गाडी थांबल्यावर पोर्टर गाडीला शिड्या लावून उतारुंची चढण्या–उतरण्याची व्यवस्था करी. रेल्वेगाडी थांबली की उतरलेली माणसे ही एवढी कमी असत की, त्यांची संख्या मोजणे स्टेशनमास्तरला सहज शक्य होई.

**– संकलित**

●●●

रूढी ही जुलमी राज्यकर्त्यासारखी असते.

# परिसर वार्ता

**– संकलित**

## डॉ. बेडेकर विद्या मंदिर

१. दि. २९/६/२०१३ रोजी अक्षदा जोशी यांनी शिक्षकांसाठी 'आय लव्ह माय टीचर' या विषयावर व्याख्यान सादर केले.

२. M.T.S.२०१३ या परीक्षेचा निकाल १००% लागला असून कु. ऋजुता नयन काबाडी राज्यात २७ वी आली.

३. पितांबरी उद्योग समूह व धावते नवनगर वृत्तपत्र आयोजित 'फन स्कूल' या कार्यक्रमात कॉमेडी एक्सप्रेस मधील श्री. भूषण कडू यांनी कार्यक्रम सादर केला. दि. १२/७/२०१३ रोजी हा कार्यक्रम सादर झाला.

४. दि. २२/७/२०१३ रोजी गुरुपौर्णिमा कार्यक्रम इ. ५ वी ते १० वीसाठी घेण्यात आला. इ. ५ वी, ६ वीच्या कार्यक्रमासाठी श्रीमती आशा जोशी (निवृत्त माजी शिक्षिका) व इ. ७ वी, १० वी साठी व्यसनमुक्तीकार श्री. रघुनाथ बापू देशमुख (शाळेचे पालक) उपस्थित होते.

५. लोकमान्य टिळक जयंती निमित्त इ. ५ वी ते १० वीच्या विद्यार्थ्यांसाठी दि. २३/७/२०१३ रोजी हस्ताक्षर स्पर्धा, दि. २९/७/२०१३ रोजी वक्तृत्त्व स्पर्धा घेण्यात आली. दि. १/८/२०१३ रोजी लोकमान्य टिळक पुण्यतिथी व अण्णाभाऊ साठे जयंती संयुक्त कार्यक्रम घेण्यात आला. मा. मुख्याध्यापक श्री. गवई यांनी मार्गदर्शन केले.

६. लोकमान्य टिळक पुण्यतिथी निमित्त ब्राह्मण सभा ठाणे तर्फे दि. २७/७/२०१३ रोजी संस्कृत सुभाषित पाठांतर स्पर्धेमध्ये कु. ऋचा जोशी प्रथम, तर केतकी मोरेला उत्तेजनार्थ पारितोषिक मिळाले.

७. दि. ३/८/२०१३ रोजी I.P.H./उत्तेजन ग्रुप (स्वमदत गट) यांनी शिक्षकांसाठी सेमिनार घेतले. डॉ. अश्विनी, डॉ. मृणालिनी, डॉ. अल्पा, सौ. रमा उपस्थित होते.

## सौ. आनंदीबाई जोशी माध्यमिक विभाग

**चीन येथे आयोजित केलेल्या विज्ञान प्रदर्शनाचा निकाल:**

कु. चिन्मय मराठे, कु. अर्णव गद्रे, कु. साक्षी भट आणि कु. शांभवी जोशी हे एकूण चार विद्यार्थी नायजिंग चायना येथे आयोजित केलेल्या २८ व्या कास्टिक प्रदर्शनात सहभागी झाले होते. 'वृक्षलागवडीचे जतन' हा प्रकल्प त्यांनी सादर केला. आंतरराष्ट्रीय पातळीवर सर्वोत्तम प्रकल्प सादरीकरणाचा पुरस्कार त्यांना प्राप्त झाला. आंतरराष्ट्रीय पातळीवर सतत सहा वर्षे हा पुरस्कार मिळत आहे.

**Indian Institute for Studies in Mathematics आयोजित गणित प्रावीण्य शोध परीक्षेचा निकाल:**

या परीक्षेस बसलेल्या पंचावन्न विद्यार्थ्यांपैकी खालील विद्यार्थ्यांना प्रमाणपत्रे आणि बक्षिसपात्र रक्कम दिली गेली.

| इ. | विद्यार्थ्यांची नावे | श्रेणी |
|---|---|---|
| ५वी | वेदांत ओक | ११३ वी |
| ५ वी | विश्वराज बोरकर | १४९ वी |
| ७ वी | शांभवी जोशी | २८ वी |
| ८ वी | गायत्री पाटील | १९३ वी |
| ९ वी | तक्ष सत्रा | ८९ वी |

**वाडिया कॉलेज पुणे आयोजित एप्रिल २०१३ महाराष्ट्र प्रज्ञा शोध परीक्षेत खालील विद्यार्थ्यांनी बक्षिसे पटकावली :**

१) गायत्री पाटील – इ. ८ वी – विशेष पुरस्कार
२) अमित मलिये – इ. ९ वी – विशेष पुरस्कार
३) श्रीरंग देशमुख – इ. १० वी – प्रमाणपत्र

रूढी ही प्रेमाच्या मार्गातली मोठी धोंड असते.

**२०१२ – २०१३ गणित प्रज्ञा परीक्षेचा निकालः**

मुंबई गणित अध्यापक मंडळ आयोजित गणित प्रज्ञा परीक्षेत शुभम पट्टेकर या विद्यार्थ्यास रजत पदक मिळाले.

**इंडियन क्रिकेट ॲकेडमीतर्फे आयोजित केलेल्या क्रिकेट क्षमता चाचणीत राष्ट्रीय पातळीवर मास्टर तनय मुसळे इ. ६ वी याने 'ब' श्रेणी पटकावली.**

## जोशी बेडेकर महाविद्यालय

### महाविद्यालयाचा वृत्तांत

• अंबिका कुटीरच्या सहयोगाने सुरू झालेल्या महाविद्यालयातील विवेकानंद स्टडी सर्कलच्या विद्यमानाने तीन महिन्याचा Certificate Course सुरु करण्यात आला.

**• मराठी विभाग**

मराठी विभागाच्या वतीने मराठी वाङ्मय मंडळाचे उद्घाटन डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाचे माजी कुलगुरू, अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाचे अध्यक्ष प्रख्यात साहित्यिक प्रा. डॉ. नागनाथ कोतापल्ले यांच्या हस्ते २४ जुलै, २०१३ रोजी महाविद्यालयाच्या कात्यायन सभागृहात मोठ्या उत्साहात संपन्न झाले. अध्यक्षस्थानी महाविद्यालयाच्या प्राचार्या डॉ. शकुंतला सिंह महोदया होत्या. या प्रसंगी तृतीय वर्षात प्रथम श्रेणीत उत्तीर्ण झालेल्या विद्यार्थ्यांचा सत्कार करण्यात आला.

**• अर्थशास्त्र विभाग**

तृतीय वर्षाच्या पेपर क्रमांक ४ आणि ५ करिता विद्यार्थ्यांसाठी मार्गदर्शनपर कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले. आंतरराष्ट्रीय कार्यशाळेच्या संकेत स्थळाचे उद्घाटन करण्यात आले. त्या अनुषंगाने 'A Beautiful Mind' या विषयावर डॉ. जॉन नॅश (नोबल पुरस्कर्ते) यांनी माहितीपट सादर केला.

**• भूगोल विभाग**

भूगोल विभागाच्या वतीने तृतीय वर्षाच्या विद्यार्थ्यांसाठी कलावंतीन गड आणि नेरळ येथे गिर्यारोहणाचे आयोजन करण्यात आले होते. कोपरी ठाणे येथील 'चिंधी बाजार' या विषयावर अभ्यासपत्रक सादर करण्यात आले.

याशिवाय विद्यार्थ्यांनी (1) Social Networking and Youngsters (2) Investigatgion hygine of food stall चेंदणी बंदर रोड (3) Study of existance of primary activity in Thane city अभ्यासपत्रक Neem business ठाणे स्टेशन इतयादी विविध विषयांवर प्रकल्पांचे आयोजन केले.

**• हिन्दी विभाग**

महाविद्यालयाच्या हिन्दी विभागातर्फे 'हिन्दुस्थानी प्रचार सभेच्या सहकार्याने 'भाषण स्पर्धेचे' आयोजन केले होते. विषय होता – 'बालिकाओं की शिक्षा ही देश की सामाजिक और आर्थिक समस्याओं के समाधान का रास्ता है।' यात एकूण ७५ विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला होता. कार्यक्रमाचे उद्घाटन डॉ. सुशीला गुप्ता (प्रतियोगिता प्रायोजक निर्देशक, हिन्दुस्तानी प्रचार सभा) श्रीमती सुमन सारस्वत (हिन्दी मासिक 'वाग्धारा' च्या संपादिका) डॉ. स्मिता भिडे (उपप्राचार्या) प्रा. अनिल ढवळे (विभागप्रमुख) प्रा. प्रतिभा माथुर (स्पर्धा निर्णायक) आणि डॉ. जयश्री सिंह यांच्या हस्ते झाले.

स्पर्धेचे समन्वयक श्री. सुनील कोठारे यांनी स्पर्धेचा निकाल जाहीर केला.

- आफरीन शेख (प्रथम वर्ष कला) प्रथम –३००० रु.
- पल्लवी मित्रा (प्रथम वाणिज्य) द्वितीय – २००० रु.
- तहसीन रावी (कनिष्ठ महा.) तृतीय – १५०० रु.

या संपूर्ण कार्यक्रमास प्राचार्या डॉ. शकुंतला सिंह महोदयांचे मार्गदर्शन लाभले.

**• निसर्ग मंडळ**

महाविद्यालयाच्या निसर्ग मंडळाद्वारे विद्यार्थ्यांसाठी निसर्ग

कोणतेही संकट क्षुल्लक नसते.

मंडळाच्या प्रास्तविकाचे आयोजन करण्यात आले.

नैसर्गिक गिर्यारोहणाचे कर्जत जवळील पेब येथील विकट गडावर आयोजन करण्यात आले.

**• व्यावसायिक कायदे**

व्यावसायिक कायदे विभागातर्फे द्वितीय वर्ष वाणिज्य शाखेतील विद्यार्थ्यांसाठी दि. ३०/६/२०१३ रोजी Dimensions of Personality with reference to emotional Quotient या विषयावर महाविद्यालयातील तत्त्वज्ञान विभागातील ज्येष्ठ प्राध्यापिका डॉ. सौ. शोभा दोशी यांचे व्याख्यान आयोजित करण्यात आले.

तसेच, द्वितीय वर्षातील विद्यार्थ्यांसाठी दि. १६/६/२०१३ रोजी Education Policies in India, दि. ३१/७/२०१३ रोजी should CBI be an Independent Authority आणि ८/८/२०१३ रोजी whether Elections are to be conducted in colleges या विषयांवर गटचर्चा आयोजित करण्यात आली होती.

**• व्यास सभा**

महाविद्यालयातील 'व्यास सभा' या उपक्रमांतर्गत दर शुक्रवारी प्राध्यापकांमध्ये ज्वलंत विषयावर साधकबाधक चर्चा प्राचार्या डॉ. शकुंतला सिंह महोदयांच्या उपस्थितीत होत असते.

प्राध्यापकांच्या संपाला अनुलक्षून 'Role of a teacher in Society' या विषयावर सर्व शिक्षकांनी आपले मत व्यास सभेत व्यक्त केले.

केदारनाथ मधील अतिवृष्टीमुळे झालेले नुकसान आणि मनुष्य हानी या घटनेवर आधारित 'Monsoon of Life' या विषयावर अतिशय मौलिक चर्चा शिक्षकांनी प्राचार्यांच्या मार्गदर्शनाखाली केली.

पावसाळ्यातील वातावरण अतिशय आल्हाददायक असते, म्हणून सर्व प्राध्यापकांनी स्वरचित व काही प्रसिद्ध कवींच्या कविता सादर केल्या.

'Dance -Bar' वर बंदी यावी, यावर सर्वत्र चर्चा सुरू असताना व्यास सभेत देखील कायद्याला अनुलक्षून 'The Supreme Court Verdict on dance bars' या विषयावर चर्चा केली.

**• गणित–सांख्यिकी विभाग**

प्रा. डॉ. स्मिता भिडे आणि प्रा. श्रद्धा भोने यांनी UGC (विद्यापीठ अनुदान आयोग) कडे Minor Research Project सादर करून त्याला मान्यता मिळवली. प्रा. डॉ. स्मिता भिडे यांनी TY-SY B.Com. करिता हिंदुजा महाविद्यालयात C.S.A. and computer programming या विषयावर कार्यशाळेचे आयोजन केले.

**SMART COURSE**

मुंबई विद्यापीठाच्या अंतर्गत महाविद्यालयात दोन वर्षांची 'Associate Degree', Smart Course सुरू करण्यात आले आहेत. मुंबईत असणाऱ्या सर्व 'Smart Course College' मधील अभ्यासक्रमानुसार हे Courses चालविण्यात येणार आहेत.

डॉ. विजय पागे (Director MIT) वांद्रे यांनी Smart Course चे उद्घाटन केले व प्राचार्या डॉ. शकुन्तला सिंह यांचे शुभाशीर्वाद लाभले. सर्व प्रकारच्या सुविधा उत्कृष्ट शिक्षणासहित विद्यार्थ्यांना दिल्या जाणार आहेत.

## बांदोडकर विज्ञान विद्यालय

**"Unveiling Life beyond DNA Discovery"**

DNA Structure च्या शोधाला साठ वर्षे झाल्याचे औचित्य साधून जैवतंत्रज्ञान व सूक्ष्मजीवशास्त्र या विभागांनी दि. १३ जुलै, २०१३ एक दिवसाची परिषद घेतली.

प्राचार्या डॉ. (सौ.) पेजावर यांनी या परिषदेचे

उद्घाटन केले. डॉ. अभिषेक मुळ्ये (Research Scientist Institute of Chemical Technology), डॉ. दिशा मोदी, (Former Research Associate, St. Jude Children's Research Hospital, Memphis, Tennessee), डॉ. आर. सी. पाटील (Associate Prof. Bhavans College) आणि डॉ. प्रशांत खडके (Product Manager, Asia Pacific Blorad Laboratories) या मान्यवरांची भाषणे झाली.

२०० विद्यार्थी (पदवी व कनिष्ठ महाविद्यालय) व २० शिक्षक यांनी या परिषदेमध्ये सहभाग घेतला.

### उर्जा क्लब

दि. ७.८.२०१३ रोजी रसायनशास्त्र विभागाच्या 'उर्जा' या क्लब तर्फे डॉ. शिवाजी ढगे, माजी Dy. Director, NEERI, मुंबई यांचे "Environmental protection and Challenges in Sustainable Development" या विषयावर पतंजली सभागृहात व्याख्यान झाले. ८० विद्यार्थी व १० प्राध्यापक या कार्यक्रमास उपस्थित होते.

### सृष्टी क्लब

दि. १०.८.२०१३ रोजी वनस्पतिशास्त्र विभागाच्या 'सृष्टी' या क्लबचे Inauguration Lecture प्राचार्या डॉ. (सौ.) माधुरी पेजावर यांच्या हस्ते पातंजली सभागृहात झाले. "My Life, My Career" या विषयावर त्यांनी उपस्थितांना मार्गदर्शन केले. या कार्यक्रमास ७५ विद्यार्थी व १२ प्राध्यापक उपस्थित होते.

### कार्यशाळेत सहभाग

डॉ. पूजा जगासिया, रसायनशास्त्र विभाग, यांनी दि. ०२ व ०३.०८.२०१३ रोजी SIES College of Arts Science and Commerce, Sion (W) येथे "Advances in NMR Techniques and Applications" या PG Lecture Series मध्ये सहभाग घेतला.

### अभिनंदन

प्रा. प्रकाश माळी, रसायनशास्त्र विभाग यांना राष्ट्रीय समता संमेलन, धुलिया यांच्यातर्फे ''फुले शाहू आंबेडकर राष्ट्रीय लोकमित्र पुरस्कार'' प्रदान करण्यात आला.

प्रा. अनिल आठवले, यांना दि. ०७.०७.२०१३ रोजी पनवेल वेलफेअर सोशल क्लब यांच्यातर्फे ''राष्ट्रीय क्रांतिज्योती विकास अॅवार्ड २०१३'' प्रदान करण्यात आला.

### सेवानिवृत्ती

आमच्या महाविद्यालयातील प्रयोगशाळा परिचर श्री. मधुकर बापू शेलवले, संख्याशास्त्र विभाग हे दि. ३१ जुलै २०१३ रोजी सेवानिवृत्त झाले.

## विद्या प्रसारक मंडळाचे ठाणे नगरपालिका विधी महाविद्यालय

१. वि.प्र.म.ठा.न.पा. विधी महाविद्यालयाची द्वितीय विधी वर्गाची सुरुवात दिनांक १ जुलैला तर तृतीय विधी वर्गाची सुरुवात ८ जुलैपासून करण्यात आली. प्रथम विधी वर्गासाठी १० जुलै, २२ जुलै आणि १ ऑगस्ट यादिवशी सुरुवात करण्यात आली.

२. **Cyber Crimes**

VPM'S TMC विधी महाविद्यालयातर्फे दिनांक ४ जुलै २०१३ रोजी पेशवे हॉलमध्ये सायं. ६.३० ते ८.३० या दरम्यान सायबर गुन्हे व माहिती तंत्रज्ञान कायदा २००० या विषयावर अॅड. प्रशांत माळी यांचे व्याख्यान आयोजित करण्यात आले होते. सदर कार्यक्रमासाठी VPM'S च्या Polytechnic महाविद्यालयाचे IT विषयाचे विद्यार्थी, तसेच प्राध्यापक उपस्थित होते. सदर विषय एकूण विधी अभ्यासक्रमामध्ये नसताना विद्यार्थ्यांना या कायद्याचीदेखील माहिती व्हावी म्हणून आयोजित करण्यात आला होता.

### ३. 'वाहन अपघात' कार्यशाळा

VPM'S च्या TMC विधी महाविद्यालय या माध्यमातून दिनांक ६ जुलै २०१३ रोजी महाविद्यालयाच्या मनु सभागृहामध्ये सायंकाळी ६ ते ९ या दरम्यान "Motor Accident Claims Tribunal-Law and Practice" या विषयावर ॲड. केशव पुजारी यांचे व्याख्यान आयोजित करण्यात आले होते. या व्याख्यानात त्यांनी अपघात दावे, बचाव आणि अपील अशा विषयांसह अनेक विषयांवर मार्गदर्शन केले. हा विषय विधी अभ्यासक्रमात नसताना देखील विद्यार्थ्यांना या विषयाची माहिती व्हावी या हेतूने या व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले होते.

### ४. सर्वोच्च न्यायलयाच्या निकालावर चर्चा सत्र

VPM'S TMC विधी महाविद्यालयामध्ये दिनांक २३ जुलै रोजी सायं. ७.३० ते ९ या दरम्यान मा. सर्वोच्च न्यायलयाने दिलेल्या निर्णयावर ''राजकारणाचे गुन्हेगरिकरण : सर्वोच्च न्यायलयाचा निकाल'' असा विषय ठेवून चर्चा सत्र आयोजित करण्यात आले. या चर्चासत्रात प्रभारी प्राचार्या श्रीमती श्रीविद्या जयकुमार व ॲड. मनोज भट यांनी सहभाग घेतला. या चर्चासत्रामध्ये लिली थॉमस वि. भारत सरकार व पिपल्स वॉच वि. भारत सरकार या निर्णयाचा आधार घेऊन राजकीय हक्क लोकप्रतिनिधी कायदा भारतीय संविधान व इतर न्यायनिवडे या विषयावर चर्चा करण्यात आली. यानंतर अशाच प्रकारे महत्त्वाच्या विषयांवर चर्चासत्रे घडवून आणावीत अशी इच्छा विद्यार्थींनी व्यक्त केली.

### ५. करिअर मार्गदर्शन कार्यशाळा

VPM'S TMC विधी महाविद्यालयाच्या मनु सभागृहामध्ये दिनांक २७ जुलै २०१३ रोजी सायंकाळी ५ ते ९ या दरम्यान ''व्हीजन ॲकडेमीच्या सोबत'' करिअर मार्गदर्शन या विषयावर सेमीनारचे उद्घाटन हे निवृत्त जिल्हा न्यायाधीश श्री. देशमुख यांनी केले. या सेमिनारमध्ये खालीलप्रमाणे अनेक विषयांवर मार्गदर्शन करण्यात आले.

| क्र. | पाहुणे | विषय |
|---|---|---|
| १. | श्री. एस. एस. देशमुख (निवृत्त जिल्हा न्यायधीश) | न्यायपालिका |
| २. | श्री. विजय आगाशे (वकील, ठाणे) | वकिली व्यवसाय व त्यातील संधी |
| ३. | श्रीमती श्रीविद्या जयकुमार (प्रभारी प्राचार्या, वि.प्र. म.चे टी एम. सी. विधी महाविद्यालय) | शैक्षणिक क्षेत्रातील संधी |
| ४. | कु. निलाक्षी भागवेकर | उद्योग क्षेत्रातील संधी |
| ५. | श्रीमती धनश्री केळकर | कर विषयक वकिली |
| ६. | श्री. भुलेश्वर हिंगे (सरकारी वकील, ठाणे) | सरकारी वकिली आणि इतर मार्ग |
| ७. | श्री. पंकज मगर (वकील, औरंगाबाद) | एल.पी.ओ. मधील संधी |

६. VPM'S TMC विधी महाविद्यालयाच्या अंशकालीन प्रा. रंजन जोशी आणि तृतीय विधी वर्षाच्या २० विद्यार्थ्यांनी महाराष्ट्र ज्युडीशियल ॲकेडमी उत्तन भायंदर, जि. ठाणे दिनांक २७ जुलै २०१३ रोजी आयोजित ''मानवी तस्करी व मानवी अधिकार'' या चर्चासत्रात भाग घेतला. सदर चर्चासत्रामध्ये मा. उच्च न्यायलयाच्या न्यायधीशांनी सदरील विषयावर मार्गदर्शन केले.

## तंत्रनिकेतन

### महाराष्ट्र राज्य तंत्रशिक्षण मंडळ (MSBTE) उन्हाळी (सन २०१२-२०१३) परीक्षेचे निकाल जाहीर

महाराष्ट्र राज्य तंत्रशिक्षण मंडळाच्यावतीने घेण्यात आलेल्या पदविका उन्हाळी सन २०१२-२०१३ परीक्षेचे निकाल नुकतेच जाहीर झाले असून वि.प्र. मंडळाच्या तंत्रनिकेतनच्या विद्यार्थ्यांनी चांगले यश संपादन केले आहे.

तंत्रनिकेतनमध्ये अव्वल क्रमांकाने उत्तीर्ण झालेल्या विद्यार्थ्यांची अभ्यासक्रमानुसार नावे व गुण खालीलप्रमाणे

**प्रथम वर्ष (सत्र I + सत्र II)**

| अ.क्र. | विद्यार्थ्याचे नाव | अभ्यासक्रम | मिळालेले गुण | टक्केवारी |
|---|---|---|---|---|
| १. | जैसवाल मयांक सत्यप्रकाश | CH | १२५२/१५०० | ८३.४७ |
| २. | कविश्वर रोशनी एस. | CO | १२६९/१४५० | ८७.५२ |
| ३. | देशपांडे अथर्व एन. | EPS | १२३३/१४०० | ८८.०७ |
| ४. | चौधरी नीता एस. | IE | १२२३/१३५० | ९०.६५ |
| ५. | म्हात्रे साक्षी | IF | १२५५/१४५० | ८६.५५ |
| ६. | गोलये मेधा नंदकिशोर | IS | ११४९/१३५० | ८५.११ |
| ७. | दक्षिणदास तृप्ती राजेंद्र | MU | ११९०/१३५० | ८८.१३ |

**द्वितीय वर्ष (सत्र III + सत्र IV)**

| अ.क्र. | विद्यार्थ्याचे नाव | अभ्यासक्रम | मिळालेले गुण | टक्केवारी |
|---|---|---|---|---|
| १. | जाधव प्रेम प्रमोद | CH | १३६६/१६७५ | ८१.५५ |
| २. | बागले अक्षता संतोष | CO | १४२२/१५७५ | ९०.२९ |
| ३. | परब तेजस | EP | १५०८/१८०० | ८३.७८ |
| ४. | चव्हाण निखिल दत्ताराम | IE | १४९३/१७५० | ८३.७४ |
| ५. | वैती प्रिया जितेंद्र | IF | १४४६/१५५० | ९३.२९ |
| ६. | मोहिते सिद्धेश गोविंद | IS | १४५०/१७५० | ८२.८५ |
| ७. | शर्मा तृप्ती अनुजकुमार | MU | १४८६/१७७५ | ८३.७२ |

**तृतीय वर्ष (सत्र V + सत्र VI)**

| अ.क्र. | विद्यार्थ्याचे नाव | अभ्यासक्रम | मिळालेले गुण | टक्केवारी |
|---|---|---|---|---|
| १. | खान शाहिस्ता मुनाफ | CH | १४२२/१७०० | ८३.६४ |
| २. | चौबे अपूर्व बिमल | CO | १३४७/१५२५ | ८८.३३ |
| ३. | पै अक्षय पी. | EP | १४११/१६५० | ८५.५२ |
| ४. | साजेकर महेश्वरी शंकर | IE | १५४४/१७५० | ८८.२७ |
| ५. | शेकार रोशनी चंद्रकांत | IF | १३८९/१६०० | ८६.८१ |
| ६. | पाटील किरण बाबूलाल | IS | १४५१/१७०० | ८५.३५ |
| ७. | घाग दक्षता दत्ता | MU | १५१०/१८०० | ८३.८९ |

‘अपयशाचं खापर नशिबावर फोडण्यापेक्षा खडतर मेहनत करून यशाचं शिखर गाठा. – हेरी गोल्डन

वरील यशस्वी विद्यार्थ्यांचे वि. प्र. मंडळाचे तंत्रनिकेतनचे प्राचार्य दि. कृ. नायक, विभाग प्रमुख, शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी आणि पालक वर्ग यांच्या तर्फे अभिनंदन करण्यात आले.

विद्या प्रसारक मंडळाचे तंत्रनिकेतन ठाणे MSBTE उन्हाळी परिक्षा -२०१३ नियमित विद्यार्थ्यांचे उत्तीर्णतेचे विश्लेषण

| वर्ष आणि अभ्यासक्रम | एकूण परीक्षेस बसलेले | डिस्टींगशन | प्रथम | द्वितीय | उत्तीर्ण | एकूण | टक्केवारी |
|---|---|---|---|---|---|---|---|
| प्रथम वर्ष | ३६८ | ४७ | ९९ | ४५ | १ | १९२ | ५२.१७ |
| द्वितीय वर्ष | ४०७ | ८१ | १३९ | ३५ | ० | २५५ | ६२.६५ |
| तृतीय वर्ष | २८२ | १५० | १०५ | १२ | ० | २६७ | ९४.६८ |

**वि. प्र. मंडळाचे तंत्रनिकेतनमधील श्री. रामचंद्र बबली केरकर सेवानिवृत्त**



वि. प्र. मंडळाचे तंत्रनिकेतनमध्ये श्री. रामचंद्र बबली केरकर हे प्रयोगशाळा परिचर म्हणून २३.०९.१९८८ पासून केमिकल इंजिनिअरिंग विभागात कार्यरत होते. आपल्या २५ वर्षाच्या प्रदीर्घ सेवेनंतर ते ३१ जुलै २०१३ रोजी सेवानिवृत्त झाले.

श्री केरकर हे अत्यंत मनमिळाऊ स्वभावाचे आणि कार्यतत्पर म्हणून परिचित होते. अशासकीय महाविद्यालयीन शिक्षकेतर कर्मचारी संघाच्या तंत्रनिकेतन युनिटचे ते सदस्य होते. त्यांच्या अशासकीय महाविद्यालयीन युनिटचे ते सदस्य होते. त्यांना अशासकीय महाविद्यालयीन शिक्षकेतर कर्मचारी तंत्रनिकेतन तर्फे भेटवस्तू शाल श्रीफळ देऊन सत्कार करण्यात आला आणि पुढील आयुष्य त्याचे सुखासमाधानाचे जावो अशा भावना व्यक्त करून मनःपूर्वक शुभेच्छा दिल्या.

## विद्या प्रसारक मंडळाचे स्वप्न

वेळणेश्वर पाहिलं,
ऐकली गाज समुद्राची.
परशुरामाने कोकण निर्माण केलं ...
त्याचाच आवाज तो
या सर्वांशी नातं जोडलं
आमच्या विद्या प्रसारक मंडळाने
टाकत दोन पावले पुढे
ओळखून गरज काळाची
परशुरामाच्या हातातील परशु घेत
घातला घाव कोकणच्या कातळावर
आणि सुरू झाली कहाणी
विराट स्वप्न प्रत्यक्षात येण्याची ...
अभियांत्रिकी गुरुकुलाची ओळखत गरज
वर्तमानाचे आरोग्य जपणाऱ्या
आमच्या डॉक्टरांनी
स्टेथस्कोप लावला कोकणच्या मातीला
तिची नाडी ओळखत
केली धडपड सुरू
डॉक्टरांची विजय मिळवणारी स्पंदने ऐकत
समुद्रही घाबरला.
आता आपला प्रतिस्पर्धी समोर आहे
असा विचार करत, क्षणभर थरारला ...

**- मोहन पाठक**

# जाहीर आवाहन

**विद्या प्रसारक मंडळ, ठाणे :**

विद्या प्रसारक मंडळ १९३५ सालापासून गेली सुमारे ७५ वर्षे ठाण्यात शैक्षणिक प्रसाराचे कार्य करीत आहे. आधुनिक पद्धतीचे व जागतिक दर्जाचे अभियांत्रिकी महाविद्यालय सुरू करण्याचा मंडळाचा मानस आहे.

**कोकण परिसराची निवड :**

एका बाजूला समुद्रकिनारा व दुसऱ्या बाजूला सह्याद्रीच्या रांगा यांच्या मधील या पट्ट्यातील जनता गेली सुमारे ४०० वर्षे उत्पादन क्षमता नसल्यामुळे जगण्यासाठी झगडत असते. पर्यटन व्यवसाय हाच काय तो व्यवसाय त्यांना थोडीफार साथ देत असतो.

कोकणातल्या रत्नागिरी आणि सिंधुदुर्ग जिल्ह्यांची एकूण लोकसंख्या जवळ जवळ ३० लाख आहे. तरी सुद्धा उच्च शिक्षणामध्ये दोन्ही जिल्हे मागास म्हणून गणले जातात आणि त्याचे कारण म्हणजे, उच्च शिक्षणाकडे कमी वळतात हे आहे. २००७ साली दिल्लीच्या विद्यापीठ अनुदान आयोगाने स्थापन केलेल्या एका समितीने संपूर्ण देशभर याविषयावर सर्वेक्षण करून आपला अहवाल सादर केला होता. त्या अहवालात संपूर्ण देशात ज्या भागामध्ये पुढे येण्याची प्रवृत्ती दिसत नाही, अशा भागांत आधुनिक धर्तीवर महाविद्यालये मोठ्या संख्येने निर्माण केली पाहिजे असे मत मांडले होते. भारताची उच्च शिक्षणासाठी प्रवेश घेणाऱ्यांची सरासरी फक्त १२.४ आहे. त्या समितीला असेही आढळून आले की ५९३ जिल्ह्यांपैकी ३७४ जिल्हे असे आहेत की त्याठिकाणी उच्च शिक्षणासाठी काहीच सोयी नाहीत. महाराष्ट्र राज्यात उच्च शिक्षणासाठी प्रवेश घेणाऱ्यांच्या टक्केवारीचे प्रमाण १७.३३ टक्के असून रत्नागिरी जिल्ह्याची उच्च शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांची टक्केवारी सर्वांत कमी आहे.

उच्चशिक्षण देणाऱ्या ७० टक्के संस्था एक तर मोठ्या शहरांत किंवा नागरी भागांत आहेत. याचे मुख्य कारण तेथील विद्यार्थ्यांना खर्चिक उच्च शिक्षण घेणे परवडते व शिक्षणासाठी आवश्यक शिक्षकवर्गही उपलब्ध होतो. यामुळे ग्रामीण भागांतील विद्यार्थ्यांना उच्च शिक्षणासाठी मोठ्या शहरातील महाविद्यालयांमध्ये जावे लागते. यावर उपाय एकच, की अशा प्रकारच्या संस्था आणि उच्च दर्जाचे शिक्षण देणारी महाविद्यालये ही ग्रामीण भागात काढली जावीत. यासाठी आवश्यक त्या मुलभूत सोयी सुविधा उपलब्ध करणे व त्यासाठी लागणारा खर्च करणे यांची पूर्तता करावी लागते. त्यामुळे गरजू व हुशार ग्रामीण विद्यार्थ्यांची सोय तर होईल; पण त्या ग्रामीण भागाचा मोठ्या प्रमाणावर विकास घडून येईल. तिथल्या लोकांचा फायदा व गरजूंना कामधंदे उपलब्ध होतील आणि त्या ग्रामीण भागाचे महत्त्वही वाढेल.

**विद्या प्रसारक मंडळाच्या नवीन प्रकल्पविषयी:**

**कोकणातील गुहागर जवळ असलेला वेळणेश्वर हा ग्रामीण भाग मंडळाने नियोजित शैक्षणिक प्रकल्पासाठी निवडला आहे.** त्या गावची लोकसंख्या जवळपास ३५०० आहे व अशा गावात सुमारे ६५ एकर वरकस जमीन मंडळाने खरेदी केली आहे. तेथे एक शंकराचे सुरेख मंदिर आहे. त्याला वेळणेश्वर असे नाव आहे. शिवाय अरबी समुद्राची किनारपट्टी ही या गावाला लागून आहे. सरकारच्या नियोजित आराखड्याप्रमाणे लवकरच तयार होणार सागरी किनारपट्टी महामार्गही वेळणेश्वर गावाच्या बाजूने जाणार आहे.

या वास्तू समूहामध्ये ६ शैक्षणिक विभागांसाठी स्वतंत्र इमारती, प्राचार्य व प्रबंधकासाठी बंगले, विषय प्रमुख व प्राध्यापक व प्रमुख कर्मचारी यांच्यासाठी स्वंतत्र वास्तू

आणि विद्यार्थ्यांसाठी वसतिगृहे व इतर संबंधित वास्तू असे सर्व मिळून दहा लाख चौरस फुटांचे बांधकाम असलेला प्रकल्पाचा पूर्ण **खर्च १५० कोटी रुपये पर्यंत अपेक्षित आहे**. त्यामध्ये ३००० विद्यार्थी निरनिराळ्या विभागांतून शिक्षण घेतील. शिक्षकी पेशातील, कार्यालयीन कर्मचारी, शास्त्रीय व इतर विषयांचे तंत्र आणि सादिलवार कामे करणारे असे सर्व मिळून १००० व्यक्ती असतील. शिवाय वरील अनुषंगाने इतर कामे करण्यासाठी प्रत्यक्ष व अप्रत्यक्ष इतरही व्यक्तींची वर्दळ वाढेल. याशिवाय, प्रकल्प सुरू झाल्यानंतर प्रकल्पा बाहेरच्या व्यक्तींनासुद्धा वाव मिळेल.

प्रकल्पाचा कल्पकतापूर्ण आराखडा जो ३००० विद्यार्थ्यांच्या सोयीसाठी तयार केला आहे. त्याला चिपळूणच्या सहाय्यक जिल्हाधिकाऱ्यांनी मंजुरी दिली असून, त्याचा पहिला टप्पा २०१२ पर्यंत पूर्ण होणार आहे. सुरुवातीला ३०० विद्यार्थ्यांना प्रवेश अपेक्षित असून अभियांत्रिकीचा एकूण ४ वर्षाचा पदवी अभ्यासक्रम असेल. २०१२-१३ शैक्षणिक वर्षापासून अभियांत्रिकी महाविद्यालय चालू करण्यात येणार आहे. त्यानंतर नव्याने अभियांत्रिकी, व्यवस्थापन, वास्तुशास्त्र आणि हॉटेल व्यवस्थापन याप्रमाणे नवीन अभ्यासक्रम सुरू होतील.

**देणगीसाठी व मुदत ठेवीसाठी आवाहनः**

मंडळाला दानशूर, समाजसेवक, उदारमताच्या व्यक्ती, यांच्याकडून मिळणाऱ्या आर्थिक मदतीशिवाय दुसरा कोणताही उत्पन्नाचा मार्ग नाही. तुटपुंज्या फीच्या उत्पन्नामध्ये अशी नवीन महाविद्यालये निर्माण करणे शक्य नाही आणि म्हणून या सर्व बांधकामासाठी लागणारा आर्थिक पुरवठा बँकांकडून कर्ज घेऊन व जनतेकडून देणारी स्वरूपात मदत घेऊन करण्यात येतो.

नियोजित अभियांत्रिकी महाविद्यालयाच्या बांधकामासाठी बँकेकडून मिळणाऱ्या कर्जाव्यतिरिक्त लागणारा निधी उपलब्ध करण्यासाठी रु. १० कोटींपर्यंत खालील अटींवर वैयक्तिक ठेवी स्वीकारण्यास धर्मादाय आयुक्त, मुंबई यांनी मान्यता दिली आहे.

१) संस्थेकडे ठेवण्यात येणाऱ्या ठेवी या कमीतकमी रु. ५०००/- त्याच्या पटीत स्वीकारण्यात येतील.

२) सदर ठेवीचा कालावधी ५/७ व १० वर्षाचा असेल. किमान ३ वर्षांपर्यंत ठेव परत केली जाणार नाही.

३) ठेवीसाठी वारसदार नेमणे आवश्यक असेल.

४) ठेवीच्या कालावधीत ठेवीदाराचा मृत्यू ओढवल्यास त्याच्या वारसास पंधरा दिवसात ठेव परत करण्यात येईल.

५) सदर ठेवीवर दरसाल दर शेकडा ५ टक्के सरळ व्याज दराने प्रत्येक वर्षाच्या मार्च महिन्याच्या अखेरीस व्याज देण्यात येईल.

६) काही अपरिहार्य कारणामुळे मुदतीपूर्वी ठेव मोडावयाची असल्यास, ठेवीदाराने ३ महिन्याची आगाऊ सूचना देणे आवश्यक असेल व ती मुदत ठेव ठेवल्यापासून सहा महिन्याच्या आत मोडल्यास त्यावर व्याज अनुदेय राहणार नाही.

या प्रकल्पावरती पुढील १० वर्षात सुमारे १५० कोटी रुपये खर्च होईल. हा प्रकल्प पूर्णत्वास जाणे हे त्यावेळेसच शक्य होईल, जेव्हा सर्व स्तरांतील दानशूर व्यक्ती व संस्थांचा हातभार लागेल. **या आवाहनातर्फे आम्ही आपणांस विनंती करतो की आपण अशा शैक्षणिक कार्यास सढळ हस्ते देणगी किंवा मुदत ठेवीच्या स्वरूपात मदत करावी व मंडळाच्या या राष्ट्रीय स्वप्नपूर्तीस हातभार लावावा.**

आपला विश्वासू,
**डॉ. विजय बेडेकर**
कार्याध्यक्ष
विद्या प्रसारक मंडळ, ठाणे

●●●

(कव्हर २ वरून – **संपादकीय**)

एकत्र केला तर कोट्यावधींपेक्षा कितीतरी मोठी रक्कम जमेल. या निमित्ताने गणपतीला व तयाच्या 'अजाण' भक्तांना दर्शन द्यायला हजर होणारे नेते, अभिनेते कोटीच्या कोटी उड्डाणांमध्ये आपल्या उंचीची 'उंच' उडी मारून जातात! लोकांच्या श्रद्धेचा गैरफायदा घेऊन असे उत्सव साजरे होतात. घराघरांमध्ये पसरलेल्या वृद्ध समाजाचा, अपंग व आजारी असणाऱ्या परिस्थितीने गांजलेल्या माणसांना आणि विद्यार्थ्यांना त्रासदायक ठरणारे हे उत्सव आहेत. रात्री बारा एक वाजेपर्यंतचा वेळ नासवण्यापेक्षा रस्ते, पर्यावरण, शिक्षण इतयादी क्षेत्रांतील प्रश्न लक्षात घेऊन विधायक प्रकल्पांना आर्थिक मदत तरी करावी. परदेशांतील रस्त्यांचे कायम गोडवे गाणारे हे नेते आणि असे उत्सव करणारी मंडळी ही सामाजिक बांधीलकी जाणतील काय?

सरकारने देश विकूनच टाकलाय, सामान्य माणसांना विरोध करण्याचेदेखील त्राण नाही. अशा स्थितीत हे बेबंद बादशहा उत्सवांच्या माध्यमातून आपण किती समाजोपयोगी काम केले याचा टेंभा मिरवतात. या मांजरांच्या गळ्यात बांधण्याच्या घंटा आणि उंदीर कोठून आणायचे? निगरगट्ट गेंड्याचे कातडे असणाऱ्या उत्सवप्रिय गुंड प्रवृत्तीच्या विरोधात लिहायचे तरी किती? असे लिहिणे वर्तमान पत्रांतून व नियतकालिकांतून प्रसिद्ध करणारे लेखक बरेच आहेत. पण त्यांचे विचार अरण्यरुदन ठरत आहेत. समाज इतका थंड आणि षंढ आहे की त्याला अशा लिखाणाचे सोयरसुतकही राहिले नाही. 'मी', 'माझे' व 'मला' या तीन आयामांशिवाय विचार करण्याच्या, उत्सव प्रियते विरुद्ध क्रांती घडवून आणायची मानसिकता तयारच होत नाही. अशा दिशाहीन उत्सव प्रियतेमुळे वाया जाणारे मनुष्यतास, खर्ची पडणारे मनुष्यबळ पाहिल्यावर भारतातील विविधतेत 'पैसा व सत्ता' हीच एकता आता शिल्लक राहिली आहे की काय असा प्रश्न पडतो. जातीधर्मांच्या जाळ्यात अडकलेला हा समाज आपल्या जातीधर्मासाठी इतके सण आणि उत्सव साजरे करतो (त्याचा अभिमान बाळगतो) हे पाहिल्यावर अविवेकाने वागणे म्हणजे काय असते ते सहज कळते. या विवेकहीन 'पुरोगामी' देशाला हे गजानना, तूच सांभाळ!!

**– मोहन पाठक**



Posting under the Reg. No. MH/MR/TNC-27/2004-2006


# विद्या प्रसारक मंडळ, ठाणे

- *अत्याधुनिक दृक्श्राव्य यंत्रणा*
- *वातानुकूलित प्रसन्न वातावरण*
- *वाहने उभी करण्यासाठी प्रशस्त जागा*

*अशा सुविधांनी युक्त*

| सभागृहाचे नाव | ठिकाण | आसन क्षमता |
|---|---|---|
| थोरले बाजीराव पेशवे सभागृह | महाविद्यालय परिसर | ३०० |
| कात्यायन सभागृह | कला/वाणिज्य इमारत, ३ रा मजला | १६० |
| पातंजली सभागृह | बा. ना. बांदोडकर विज्ञान महाविद्यालय इमारत | १६० |
| पाणिनी सभागृह | डॉ. वा. ना. बेडेकर व्यवस्थापन अभ्यास संस्था इमारत | १८० |
| मनु सभागृह | वि.प्र.मं.चे ठाणे नगरपालिका विधी महाविद्यालय इमारत | २५० |

## ❋ संपर्क ❋

कार्यवाह

**विद्या प्रसारक मंडळ**

विष्णूनगर, नौपाडा, ठाणे – ४०० ६०२

दूरध्वनी क्रमांक – २५४२६२७०


हे मासिक प्रकाशक आणि संपादक डॉ. विजय वासुदेव बेडेकर व मुद्रक श्री. विलास सांगुर्डेकर, परफेक्ट प्रिण्टस्, नुरीबाबा दर्गा रोड, ठाणे-४०० ६०१ या मुद्रणालयामध्ये छापून विद्या प्रसारक मंडळ, जिल्हा ठाणे-४०० ६०२ यांच्याकरिता विद्या प्रसारक मंडळ, डॉ. बेडेकर विद्या मंदिर, विष्णूनगर, ठाणे - ४०० ६०२ इथून प्रकाशित केले.